अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ६ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## विश्वचषकात न्युझीलंडची विजयी सलामी; ९ गडी राखून विजयी

**अहमदाबाद** : विश्वचषक स्पर्धेतील पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या गतविजेत्या इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. इंग्लंडने ५० षटकांत नऊ गडी गमावून २८२ धावा केल्या. न्यूझीलंडने ३६.२ षटकात १ विकेट गमावत २८३ धावा करत सामना जिंकला.

न्यूझीलंड संघाने १३व्या विश्वचषकाची धमाकेदार सुरुवात केली आहे. त्यांनी गतविजेत्या इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुरुवारी (५ ऑक्टोबर) न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत नऊ गडी गमावून २८२ धावा केल्या. न्यूझीलंडने ३६.२ षटकात १ विकेट गमावत २८३ धावा करत सामना जिंकला. सलामीवीर डेविन कॉनवे १५२ तर रचिन रविंद्रने शतक झळकवत १२३ धावा केल्या.



# शिक्षकाला केलेले निर्देश महागात पडले भर शाळेतच मुख्याध्यापकाला बदडले

## ● कुंभारीच्या झेडपी शाळेत एका शिक्षकाची दादागिरी
## ● महिला केंद्र प्रमुखालाही केली दमदाटी

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**शाळेतील शिक्षकाला शाळेत नीट काम करत जा, असे सांगणे मुख्याध्यापकाला भलतेच भारी पडले. मुख्याध्यापकास त्यांच्या कार्यालयातच रजेचे कारण पुढे करीत शिक्षकाने हुज्जत घालून अरेरावी, दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी देत चक्क मुख्याध्यापकाला काठी आणि लाथाबुक्क्याने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबत्या त्या शिक्षकाने केंद्रप्रमुखांना अरेरावी, अर्वाच्य शिविगाळ आणि दमदाटीदेखील केल्याने केंद्रप्रमुखदेखील संतापल्या. त्यांच्या भावना अनावर झाल्या आणि त्या ढसाढसा रडू लागल्या. या मारहाणीत मुख्याध्यापकाचे कान फाटले असून, ते गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत गुरुवारी सकाळी शाळेची घंटा वाजण्यावेळी म्हणजेच सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. सुभाषचंद्र चनबसप्पा पाटील (वय ५७ रा. बोरामणी ता.दक्षिण सोलापूर) असे जखमी मुख्याध्यापकांचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.**

शाळा म्हणजे मंदीर आणि शिक्षणाची ज्ञानगंधा समजल्या जाणाऱ्या शाळेत अशा प्रकारची लाजिरवाणी घटना घडणे हे शिक्षकी पेशाला अशोभनीय कृत्य आहे. त्यामुळे या घटनेने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या घटनेचे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील दादागिरी चव्हाट्यावर आली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील जिल्हा परिषद मराठी मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापक सुभाषचंद्र पाटील यांना महेश क्षीरसागर या सहशिक्षकाने मारहाण करून जखमी केले. जखमी मुख्याध्यापकावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गावातील प्रतिष्ठित नागरिक व लोकप्रतिनिधींनी रुग्णवाहिकेला पाचारण करून त्यांना तात्काळ दवाखान्यात दाखल केले.



बेदम मारहाणीत मुख्याध्यापकांचे कान फाटले

कुंभारी परिसरात मराठी मुलांची शाळा, जिल्हा परिषद उर्दू शाळा, जिल्हा परिषदेची मुलींची मराठी शाळा आहे. सुमारे ३०० विद्यार्थी शेथे शिक्षण घेत आहेत. मुलींच्या शाळेमध्ये महेश क्षीरसागर नावाचे सहशिक्षक कार्यरत आहेत. क्षीरसागर यांनी या मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक सुभाषचंद्र पाटील यांना रजा मागितली, परंतु आज शाळेत कार्यक्रम आहे, रजा देता येणार नाही, असे सांगत मुख्याध्यापक पाटील यांनी त्यांची रजा नाकारली. याचा राग मनात धरून क्षीरसागर याने मुख्याध्यापक पाटील यांना लाकडी दांडा व लाथाबुक्याने मारहाण केली.

मुख्याध्यापकास मारहाणीचा प्रकार सुरु असताना कुंभारीचे केंद्रप्रमुख कुंदा राजगुरू, कुंभारीचे सामाजिक कार्यकर्ते गजानन होनराव, स्वप्निल थ्वंटे, राहुल वंजारी, पप्पू कुदरे, आप्पाशा चांगले यांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले आणि जखमी मुख्याध्यापक पाटील यांना पुढील उपचारासाठी म्बुलन्समध्ये सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटलकडे घेऊन गेले. केस पेपर आणि पुढील प्रक्रिया होईपर्यंत सर्वांनी पाटील यांना सहकार्य केले. घटनेची माहिती मिळताच पाटील यांचे नातेवाईक सिव्हील हॉस्पिटलमध्ये पोहचले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.



### शिक्षकाने अर्वाच्य भाषेने भावना अनावर


एकीकडे उज्ज्वल भारत आणि उज्ज्वल भारताची नवी पिढी घडविणाऱ्या पवित्र अशा शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी, निंदनीय अशी घटना कुंभारीत घडली. सहशिक्षकाकडून मुख्याध्यापकास मारहाण करण्यात येत असल्याची घटना घडत असताना केंद्र प्रमुख कुंदा राजगुरु यांनी त्या दोघांनाही समजावण्याचा प्रयत्न करत होत्या. त्यावेळी सहशिक्षक महेश क्षीरसागर याने त्यांनाही शिविगाळ केली. अर्वाच्य भाषा वापरून दमदाटी केली. त्याची वागणूक पाहून केंद्र प्रमुख राजगुरु यांच्या भावना अनावर झाल्या आणि त्या ढसाढसा रडल्या. माझ्या शैक्षणिक कारकिर्दीत ही पहिलीच घटना असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केली.

## सोलापुरात पाच वर्षाच्या बालिकेवर अमानुष कृत्य

### ● मुलगा बालसुधारगृहात, बाप न्यायालयीन कोठडीत ● आईला नोटीस देऊन पाठवले घरी

सुराज्य/सोलापूर

एकीकडे गणेश विसर्जनाची धामधूम सुरू असताना शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या बहुचर्चित वस्तीत एका विधी संघर्ष बालकाने शेजारीच राहणाऱ्या ५ वर्षीय बालिकेसोबत अमानुष व दुष्कृत्य केल्याची घटना सोलापुरात घडली. दरम्यान, त्या पिडितेच्या नाजूक अंगात बोट घातल्याने पिडितेला रक्तस्त्राव झाला. तिच्यावर अद्यापही एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे सांगण्यात आले. दरम्यान त्या मुलाला बालसुधारगृहात,



बापाला न्यायालयीन कोठडीत रवाना केले. आईला मात्र नोटीस बजावून घरी पाठवून देण्यात आले.

हा अमानुष प्रकार त्या अजाण बालिकेने तिच्या आईस सांगितला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तिने पतीस फोन करून हा थरारक प्रकार कानी घातला. त्या माता-पित्यांनी त्या मुलाच्या आई-वडिलांना हा प्रकार सांगितला असता उलट त्यांनी त्यांना जातीवाचक शिविगाळ करीत धमकी दिली.

त्या वस्तीत राहणाऱ्या १६ वर्षीय मुलाने बालिकेस मोबाईल दाखविण्याच्या बहाण्याने घरासमोरील मोकळ्या जागेत नेवून हे सैतानी कृत्य केले. ज्या दिवशी सर्वत्र गणेश विसर्जनाची धामधूम सुरू होती, त्याच दिवशी हा संतापजनक प्रकार घडला.

हा प्रकार समजल्यावर कामावरून घरी आलेल्या पिडीत बालिकेच्या वडिलाने पीडितेस सोबत नेऊन त्या मुलाच्या आई-वडिलास जाब विचारला असता, त्यांनी या पिडीत बालिकेच्या माता-पित्यास जातीवाचक शिवीगाळ व दमदाटी केली.

### मुलाचा बाप तडीपाराची शिक्षा भोगून नुकताच आला होता घरी

या घटनेतील त्या मुलाचा बाप घटनेच्या एका दिवसापूर्वीच तडीपाराची शिक्षा भोगून घरी आला होता. चोरी, घरफोडी, दरोडा यासारखे गंभीर गुन्हे त्याच्याविरूद्ध दाखल आहेत. त्याच्यापासून समाज स्वास्थाला बाधा पोहोचतेय हे लक्षात घेऊनच पोलीस आयुक्तालयाने त्याच्यावर तडीपारीची कारवाई केली होती. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात त्या मुलासह त्याच्या आई-वडिलांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी त्याच्या आईस नोटीस देऊन घरी पाठवले असले तरी न्यायालयाच्या आदेशानुसार त्या मुलाची रवानगी बालसुधारगृहात तर जातीवाचक शिविगाळ केल्याप्रकरणी बाप न्यायालयीन कोठडीत गेला आहे.

## उजनी@५५

## शेतीसाठी दोन तर सोलापूरसाठी तीन आवर्तने

सुराज्य/टेंभुर्णी

सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी समजल्या जाणाऱ्या उजनी धरणात ५५ टक्के (२९ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला असून, दौंडवरून ८ ते १० हजार क्युसेकचा विसर्ग येत आहे. त्यापार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाकडून उजनीतील पाणी वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार शेतीसाठी दोन तर सोलापूरसाठी तीन आवर्तने दिली जाणार आहेत.

सोलापूर जिल्ह्यात पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकरी रब्बी पेरण्यांच्या तयारीला लागले आहेत. तसेच नवीन ऊस लागवडीचे नियोजन केले जात आहे. अशातच उजनी किती टक्के भरणार, याकडे लक्ष सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. दरम्यान, शेतीला दोन तर सोलापूरसाठी तीन आवर्तने सोडण्याचे नियोजन करण्यात आल्याने शेतकऱ्यांना काहीअंशी दिलासा मिळाला आहे.

सोलापूरसह आसपासच्या जिल्ह्यांमध्ये पावणेतीन लाख हेक्टर क्षेत्राला उजनीचा आधार आहे. दुसरीकडे सोलापूर शहर, धाराशिव, इंदापूर, बारामती, कर्जत-जामखेड या शहरांनाही उजनीतूनच पाणी दिले जाते. पाण्याच्या नियोजनासंदर्भात ठरलेल्या निकषांत धरणात ३३ टक्के उपयुक्त साठा असल्याशिवाय शेतीला पाणी सोडता येत नाही. या निकषामुळेच ऐन खरीप हंगामात पिके माना टाकत होती. त्यामुळे उजनीतून पाणी सोडले गेले नाही. त्यामुळे पिकांचेही नुकसान झाले.

दरम्यान, १५ ऑक्टोबर अखेर उजनीत असलेल्या पाणीसाठ्यावर जिल्ह्याचे नियोजन निश्चित होणार आहे. शेतीसाठी जानेवारी किंवा फेब्रुवारी आणि एप्रिल-मे महिन्यात सुटणारी आवर्तने, सोलापूर शहरासाठी प्रत्येकी दोन महिन्यातून एकदा भिमा नदीतून गरजेनुसार सोडले जाईल. बाष्पीभवनामुळे आठ ते नऊ टीएमसी पाणी जाते; दहा टीएमसीपर्यंत बॅक वॉटरवरील योजनांसाठी पाणी, पाण्याची टक्केवारी ७० टक्क्यांपर्यंतच राहिल्यास पिण्याला प्राधान्य अन् मागणीनुसार शेतीला पाणी सोडले जाईल.



उजनी धरणात ५५ टक्के (२९ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला असून, दौंडवरून ८ ते १० हजार क्युसेकचा विसर्ग येत आहे. धरणातील एकूण पाणीसाठा ९२ टीएमसीवर पोहोचला आहे. आठ ते दहा हजार क्युसेकचा विसर्ग आणखी आठ दिवस राहिल्यास धरण ६०-६५ टक्क्यांवर पोहोचणार आहे.

## विहाळ येथे दिव्यांगास कुऱ्हाडीने मारहाण

**सोलापूर** : शेत जमिनीच्या वादातून कुऱ्हाड, काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत ५५ वर्षीय दिव्यांग व्यक्तीसह तिघेजण जखमी झाले. ही घटना विहाळ (ता. करमाळा) येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडली.

गंभीर जखमी झालेल्या वाल्मिकी देवकते (वय ५५) यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात करमाळा पोलिसांनी दोन महिलांसह चौघांविरुद्ध अपंग व्यक्तिचे अधिकार अधिनियम आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला. त्यापैकी एकाला पोलिसांनी अटक केली.


जखमीची पत्नी छबुबाई वाल्मीक देवकते (वय ४०, रा.विहाळ) यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी संतोष दीनकर मारकड, दीनकर हरिभाऊ मारकड, रुक्मिणी मारकड, अर्चना संतोष मारकड (सर्व रा.विहाळ) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यापैकी दीनकर मारकड याला पोलिसांनी अटक केली.

## मेहुण्याने भावजीच्या डोक्यात घातली वीट

**सोलापूर** : कौटुंबिक वादाच्या कारणावरून चिडून जाऊन मेहुण्याने भावजीच्या डोक्यात वीट घालून जखमी केल्याची घटना दि.५ ऑक्टोबर रोजी पहाटे सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास तुळजापूर नाका शांतीनगर येथील चहा कॅन्टीनवर घडली. याप्रकरणी अनिल प्रकाश जेटीथोर यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.त्यांच्या फिर्यादीवरून सिद्राम शिंदे व संघर्ष शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नवा गडी नवं राज्य,
परत नवीन सुरुवात!!

कल्याण
266-45-168

मुंबई
570-21-290

## सरकारचे सर्व डावपेच हाणून पाडा : जरांगे-पाटील

सुराज्य/सोलापूर

मराठा आरक्षणाचा लढा अंतिम टप्प्यात आला आहे. हा लढा सामान्य जनतेने उभा केला आहे. त्यामुळे सरकारची धडकी भरली आहे. त्यामुळे आरक्षणाचा लढा मोडून काढण्यासाठी सरकार अनेक प्रयत्न करत आहे. यासाठी राज्य शासन अनेक डाव टाकत समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. मी आतापर्यंत सरकारचे सर्व डाव उधळून लावले आहेत. यापुढील काळातही सरकारचे सर्व डाव हाणून पाडा. आरक्षण पदरात पडल्याशिवाय माघार घ्याची नाही, असा निर्धार मराठा आरक्षण आंदोलनात योगदान देत असलेले मनोज जरांगे- पाटील यांनी सोलापुरात बोलताना केला.

सोलापूरात सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित आरक्षणाच्या मेळाव्यात ते बोलत होते. हुतात्मा स्मृती मंदिरात सकल मराठा समाजाच्यावतीने जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणप्रश्नी जाहीर सभा झाली.यावेळी हा निर्धार केला.

यावेळी व्यासपीठावर सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजन जाधव प्रा.गणेश देशमुख उपस्थित होते. जरांगे -पाटील यांचे स्वागत झाल्यानंतर जिजाऊ वंदना सादर करण्यात आली.

आता सरकार एक डाव टाकू शकते. मराठा समाजात गट-तट पाडून एकमेकात मतभेद निर्माण करून आरक्षणाची लढाई मोडीत काढली जाऊ शकते. पण, समाजात कोणतीही फूट पडू देऊ नका. तसा प्रयत्न केल्यास संबंधित नेत्याच्या पाया पडून सांगा, की बाबा तुम्ही आंदोलनात येऊ नका. पण, आमच्या पोरांच्या अन्नात माती कालवू नका. असे सांगत त्यांना आंदोलनापासून दूर ठेवण्याचा त्यांनी सल्ला दिला.



आरक्षणाची लढाई निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला आरक्षण मिळवायचे आहे. तेव्हा आंदोलनात उद्रेक, जाळपोळ असे प्रकार न करता शांततेत आंदोलन करा, असे आवाहन करून युवकांना आत्महत्या न करण्याची विनंती मनोज जरांगे पाटील यांनी केली.

आरक्षणाची लढाई तरुणांसाठी सुरू आहे. मग या जीवनात तुम्हीच नसेल तर मग ते आरक्षण कुणासाठी मिळवायचे? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. आरक्षणाच्या निमित्ताने मराठा समाजाच्या वेदना सरकारसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. आपण आपल्या जातीशी प्रामाणिक आहोत. कुणी कितीही अमिषे, दबाव, डाव टाकले तरी आपण आपल्या जातीशी कदापि गद्दारी करणार नाही तुम्ही देखील सरकारच्या दबावाला बळी पडू नका आरक्षण लढा अंतिम टप्प्यात आहे. आरक्षण मिळाल्या शिवाय मागे नाही असा इशारा सरकारला दिला.

### सरकारची चलाखी

निरोप आला की, शिष्टमंडळ आंतरवली सराटीकडे येत आहे. आम्ही समाजातील लोक गोळा करेपर्यंत ते संभाजीनगरला आले. आले ते थेट व्यासपीठावर बसले. तुमचे काम झाले हा घ्या जीआर. उपोषण मागे घेण्यासाठी दबाव आणला मात्र जीआर वाचला असता वंशावळीच्या नोंदी असणाऱ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात येत आहे असे लिहले होते. त्यांला नकार दिला आमच्याकडे वंशावळी नाहीत म्हणूनच आम्ही तुमच्याकडे कायदा करण्याची मागणी करत आहोत हा किस्सा सांगत त्यांनी सरकारची चलाखी उजेडात आणली.

# मुस्कटदाबी...

राज्यातील पालकमंत्रीपदाच्या वाटणीवरून महायुतीच्या सत्तेत कशी धुसपूस झाली? कसे शहकाटशहचे राजकारण झाले?पुढे काय होणार? याविषयीचे विश्लेषण आम्ही केलेले आहेच.शिवाय अजून पडद्याआड लपलेल्या अनेक बाबीं आहेत.त्या आता उघड होऊ लागल्या आहेत.उपमुख्यमंत्री अजितदादा यांना व त्यांच्या सवंगड्यांना मनासारखे पालकत्व मिळाले. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला धक्का बसला.कारण १२ जिल्ह्यांमधील पालकमंत्रीपदात एकही पद शिंदे गटाला मिळाले नाही. तेव्हा शिंदे यांचा गट नाराज झाला आहे. शिवाय महामंडळांच्या अध्यक्षपदांच्या वाटपात शिंदे गट आक्रमक होणार असल्याचे संकेत आहेत.त्यामुळे शिंदे व अजितदादांच्या कुरघोडीने भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये नाराजी असल्याचे सांगण्यात येते. पण नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत, यासाठी काही काळ शांत राहण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ नेते व मंत्र्यांना दिल्या आहेत म्हणे. महायुतीमध्ये भाजप मोठा भाऊ असल्याने त्यागही करण्याचे आवाहन फडणवीस यांनी पक्षातील नेत्यांची समजूत घालण्यासाठीच केले असल्याचे उच्चपदस्थ सूत्र सांगते. शिंदे यांच्यामुळे भाजप राज्यात सत्तेत आल्याने व शिवसेनेशी जुनी युती असल्याने त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना भाजपने काही प्रमाणात स्वीकारले. मात्र गेली २५-३० वर्षे राजकारणात ज्यांच्याशी संघर्ष केला व निवडणुका लढविल्या, त्या अजित पवार व त्यांच्या सहकाऱ्यांना बरोबर घेणे, भाजपचे वरिष्ठ नेते व स्थानिक पदाधिकाऱ्यांना पटलेले नाही. पवार नाराज झाल्याने त्यांना पुणे, कोल्हापूरसह हवी असलेली पालकमंत्रीपदे भाजप पक्षश्रेष्ठींनी दिली असून महामंडळ वाटपातही शिंदे-पवार गटांना झुकते माप दिले जाणार आहे. पुण्याचे पालकमंत्रीपद गेल्याने उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील नाराज आहेत. मात्र ते पक्षातील जुने ज्येष्ठ नेते असल्याने शांत आहेत. पवार यांचा अर्थ खात्याच्या माध्यमातून निधीवाटप व अन्य बाबींमध्ये होत असलेल्या



हस्तक्षेपाबाबत भाजपने त्यांच्या असलेल्या अनेक तक्रारी फडणवीस यांना गेल्या काही महिन्यांपासून दूर कराव्या लागत आहेत. त्यादृष्टीनेच महत्त्वाच्या फाईल्सही त्यांच्या संमतीखेरीज मुख्यमंत्र्यांकडे पाठवायच्या नाहीत, असे आदेश काढण्यात आले होते. सुधीर मुनगंटीवार यांच्या सांस्कृतिक खात्यावर मुख्य मंत्री शिंदे यांच्याकडून कुरघोडी होत असल्याने तेही नाराज व अस्वस्थ असल्याची चर्चा आहे. त्यांची संकल्पना व मेहनत असताना जनतेमध्ये श्रेय मात्र शिंदे यांना मिळत आहे. महाराष्ट्रभूषण पुरस्कार समारंभाचे आयोजक सांस्कृतिक खाते होते. पण अनेक बाबींमध्ये शिंदे यांच्या कार्यालयाकडून हस्तक्षेप झाला. 'जय जय महाराष्ट्र माझा,' या गीताला राज्यगीताचा दर्जा देणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षानिमित्ताने रायगड व अन्यत्र झालेले कार्यक्रम, मंत्रालयात शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी दररोज ध्वनियंत्रणेमार्फत दिली जाणारी माहिती, अशा विविध संकल्पना व कार्यक्रमांमध्ये शिंदे यांना अधिक श्रेय मिळाले. छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे व भवानी तलवार ब्रिटनमधील वस्तुसंग्रहालयाकडून आणण्यासाठी गेले काही दिवस मुनगंटीवार प्रयत्नशील आहेत. मात्र वाघनखे आणण्याच्या करारासाठी नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात शिंदे हे नवी दिल्लीला भाजप पक्षश्रेष्ठींच्या भेटीसाठी फडणवीस यांच्याबरोबर गेले असतानाही तेथून दृकश्राव्य यंत्रणेच्या माध्यमातून सहभागी झाले. त्यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांनाही तेथे पाठविले. या समारंभाच्या शासकीय प्रसिद्धी पत्रकात मुनगंटीवार यांचा उल्लेख ओझरता होता व शिंदे यांनाच प्रसिद्धी मिळाली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकांनंतर किंवा महत्त्वाच्या बैठकांनंतर मुख्यमंत्री प्रसिद्धिमाध्यमांशी बोलतात. पण अनेकदा शिंदे-फडणवीस किंवा भाजप-शिंदे गटातील नेत्यांमध्ये या बैठकांविषयी माध्यमांना माहिती देण्यासाठी चढाओढ असल्याचे चित्र दिसते. पवार यांनी मुख्य मंत्र्यांची वॉररुम असताना काही प्रकल्पांचा पाठपुरावा करण्यासाठी आपली स्वतंत्र वॉररुम सुरू केली. पुण्यात चंद्रकांत पाटील पालकमंत्री असताना परस्पर स्थानिक अधिकाऱ्यांच्या अनेक बैठका घेतल्या होत्या. कार्तिकी एकादशीला पंढरपूरला फडणवीस जाणार की पवार, की दोघेही? हा प्रश्न कसा सोडवायचा, यावर चर्चा सुरू आहे. याबाबत आता विठ्ठलाला किंवा अमित शहांना कौल लावावा लागेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र, शिंदे-पवार गटांच्या कुरघोडीने भाजप नेत्यांमधील अस्वस्थता व नाराजी वाढत आहे. भाजप नेत्यांची मुस्कटदाबी सुरू आहे.

सामाजिक

# खलिस्तानवादी मोकाट कसे?

**भारतात खलिस्तानची निर्मिती व्हावी अशी मागणी करणाऱ्या कॅनडातील खलिस्तानवाद्यांना कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो संरक्षण देत आहेत व त्यांचे समर्थनही करीत आहेत. भारताने ज्यांना दहशतवादी घोषित केले, अशा दोन डझन खतरनाक खलिस्तानवाद्यांची यादी भारताने कॅनडाला यापूर्वीच दिली आहे. पण , त्यावर कॅनडा सरकारने कोणताही कारवाई केलेली नाही किंवा कारवाई करण्याची तयारीही दर्शवलेली नाही. उलट भारताने फरार म्हणून घोषित केलेल्या हरदीप सिंह निज्जर या खलिस्तानवाद्याची कॅनडात हत्या झाल्यानंतर त्या देशाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी स्वत:च त्या हत्येत भारतीय एजन्सीचा हात आहे असे जाहीर करून भारतालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. कॅनडाचे पंतप्रधान भारत सरकारने ज्यांना दहशतवादी म्हणून घोषित केले आहे, त्यांचीच बाजू का घेत आहेत? खलिस्तानवाद्यांना संरक्षण देणे व त्यांचे समर्थन करणे हे भविष्यात कॅनडालाही महागात पडू शकते.**

खलिस्तानवाद्यांनी पंजाबमध्ये चार दशकांपूर्वी रक्तरंजित हिंसाचार घडवला होता. काही काळाने हेच खलिस्तानवादी कॅनडामध्ये हिंसाचाराचा धुडगूस घालतील तेव्हा पंतप्रधान जस्टिन ट्रुडो काय करतील? खलिस्तानवाद्यांचे कॅनडामध्ये तेथील सरकारने लाड चालूच ठेवले, तर तेच भविष्यात कॅनडामध्येच खलिस्तानची मागणी करतील तेव्हा पंतप्रधान जस्टिन ट्रुडो त्यांना रोखू शकतील का?

जेव्हा भारतात खलिस्तान चळवळ जोरात होती तेव्हा जे घडले, ते भविष्यात कॅनडामध्ये घडू शकते. भारतात भिंद्रानवाले निर्माण झाले आणि त्याने सरकारलाच कसे आव्हान दिले हे सर्व देशाने अनुभवले आहे. जेव्हा इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत ऑपरेशन ब्लू स्टार मोहीम राबवली गेली आणि अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातून दहशतवाद्यांना वेचून वेचून भारतीय सैन्य दलाने संपवले. त्यानंतर खलिस्तानची चळवळ संपुष्टात आली. हा सर्व इतिहास जगापुढे असताना कॅनडाचे सत्ताधारी तेथील खलिस्तानवाद्यांना का आश्रय देत आहेत व त्यांचे समर्थन करून भारत सरकारलाच का जाब विचारत आहेत? पंजाबमध्ये खलिस्तानवादी चळवळ जोरात होती, तेव्हा पंजाबातील हिंदूंनी पंजाब सोडून निघून जावे असे फर्मान काढले होते. आता कॅनडामधील हिंदूंनी भारतात निघून जावे, असा फतवा शीख फॉर जस्टिसचा म्होरक्या गुरपतवंत सिंह पन्नू याने अमेरिकेतून काढला आहे. जे पंजाबमध्ये घडले तसे आता कॅनडात घडू लागले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे?

पंजाब राज्यात १९८० मध्ये खलिस्तानवाद्यांची चळवळ जोर धरू लागली तेव्हा तत्कालीन इंदिरा गांधी सरकारने त्याकडे सुरुवातीला दुर्लक्ष केले. पंजाबमध्ये हिंदूंवर हल्ले होऊ लागले व तेथील हिंदू पंजाब सोडून दिल्लीकडे जाऊ लागले तेव्हा इंदिरा गांधींना त्याचे गांभीर्य समजले. भिंद्रानवाले याची लोकप्रियता वेगाने वाढली तेव्हा सुरुवातीलाच त्याला चाप लावायला हवा होता. पण केंद्र सरकारने तेव्हा तसे काहीच केले नाही. पण भिंद्रानवाले जेव्हा भारत सरकारलाच डोईजड होऊ लागले तेव्हा त्याला संपविल्याशिवाय खलिस्तान चळवळ संपणार नाही हे कळून चुकले. ज्या काँग्रेस पक्षाने स्वत:च्या राजकीय लाभासाठी भिन्द्रानवालेला खतपाणी घातले तेच भिन्द्रानवाले हे काँग्रेससाठी नंतर भस्मासूर ठरले. शीख समाजाचे सर्वोच्च श्रद्धास्थान असलेल्या अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातच त्याने आपला तळ ठोकला होता. तेथे त्याच्यापर्यंत पोहोचणेही कठीण होते. भिंद्रानवालेला सुवर्ण मंदिरातून बाहेर काढण्यासाठी इंदिरा गांधींना लष्कराची मदत घ्यावी लागली. ऑपरेशन ब्लू स्टारमध्ये त्याची हत्या झाली. त्याच्याच दोन




सुरक्षा रक्षकांनी त्याची हत्या केली असेही सांगण्यात आले.

चाळीस वर्षांपूर्वी भारतात पंजाबमध्ये घडले त्याची सुरुवात आता कॅनडात झाली आहे काय? १९८० च्या दशकात खलिस्तान समर्थकांची सुरुवात कॅनडात झाली, त्यावेळी पियरे ट्रुडो हे कॅनडाचे पंतप्रधान होते. आजचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचे ते वडील. त्यावेळी भारतातून तलविंदर परमार हा दहशतवादी चार पोलिसांची हत्या करून कॅनडाला पळाला होता. इंदिरा गांधी या पियरे ट्रुडो यांना चांगल्या ओळखत होत्या. त्यांनी पंतप्रधान असताना कॅनडाला भेट दिली होती. मात्र, १९८२ मध्ये इंदिराजींनी तत्कालीन पंतप्रधान पियरे ट्रुडो यांच्याकडे तलविंदर परमारला भारताच्या स्वाधीन करावे, अशी मागणी केली तेव्हा त्यांनी ती फेटाळून लावली.

पियरे ट्रुडो हे पंतप्रधानपदावरून पायउतार झाल्यावर साधारण वर्षभराने जून १९८५ मध्ये एअर इंडियाच्या लंडन ते मुंबई फ्लाईट नंबर १८२ (कनिष्क)मध्ये मोठा बॉम्बस्फोट झाला व विमानातील सर्वच्या सर्व ३२९ प्रवासी ठार झाले. मरण पावलेल्यांत कॅनडाचेच नागरिक जास्त होते. या विमान बॉम्बस्फोटात कॅनडातील काही परिवार संपूर्ण संपले. विमानात बॉम्बस्फोट घडविण्यामागे तलविंदर परमार हाच सूत्रधार होता. जस्टिन ट्रुडोचे पिताजी पियरे ट्रुडो यांनी इंदिरा गांधींची मागणी मान्य करून तलविंदर परमारला भारताच्या स्वाधीन केले असते, तर कनिष्क विमानातील बॉम्बस्फोटाची घटना कदाचित टळली असती. जी चूक वडिलांनी केली तीच चूक आज त्यांचा मुलगा कॅनडाच्या पंतप्रधानपदावर असताना करीत आहे का? तेव्हा इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या, आज नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान आहेत. निज्जर हत्येप्रकरणी जस्टिन ट्रुडो हे भारतावर गंभीर व सनसनाटी आरोप करून कॅनडातील खलिस्तानवाद्यांचे समर्थन करीत आहेत, हे मोठे दुर्दैव आहे. कॅनडातील आपले सरकार चालविण्यासाठी खलिस्तानवादी-दहशतवाद्यांचे समर्थन करणे ही पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची मोठी चूक आहे. कॅनडाचे पंतप्रधानच निज्जार हत्या प्रकरणी जाहीरपणे भारताला जबाबदार धरीत आहेत म्हणून कॅनडातील खलिस्तानवाद्यांना एकप्रकारचे बळ प्राप्त होत आहे. विशेष म्हणजे कॅनडामधील भारतीय दूतावासालाही कॅनडाने निज्जार हत्येप्रकरणात गोवले आहे व तेथील भारताच्या उच्चायुक्तांची भारतात तत्काळ पाठवणी केली आहे. भारतानेही कॅनडाच्या नवी दिल्लीतील राजदूताला मायदेशी पाठवून देऊन कॅनडाला जशास तसे उत्तर दिले आहे. कॅनडातील खलिस्तानवाद्यांनी कॅनडातील भारतीय दूतावासापुढे निदर्शने केली. त्याची आखणी कॅनडातील ब्रिटिश कोलंबिया परिसरातील गुरुद्वारामध्ये झाली अशीही माहिती पुढे आली आहे. कॅनडातील खलिस्तानवादी भारत विरोधी सतत काही ना काही कार्यक्रम राबवत असतात. खलिस्तानवाद्यांचे भारत विरोधी फलक गुरुद्वारांच्या अवती-भोवती नेहमीच झळकत असतात. मध्यंतरी इंदिरा गांधींच्या हत्येचा एक चित्ररथ घेऊन खलिस्तानवाद्यांनी मोठी शोभा यात्रा काढली होती.

पण त्यांना कोणी रोखले नाही हे जास्त गंभीर आहे. कॅनडाच्या भूमीवर खलिस्तान समर्थकांना कॅनडा सरकार गेली अनेक वर्षे आश्रय देत आहे आणि आता भारत विरोधी कारवायांना सुद्धा मोकळीक देत आहे. भारताच्या विरोधात मिरवणुका-मोर्चे काढणे किंवा फलक झळकवणे यासाठी त्यांना पोलिसांची व अन्य यंत्रणांची परवानगी कशी दिली जाते हे गूढ आहे. स्वत: कॅनडाचे पंतप्रधानच खलिस्तानवाद्यांची बाजू घेत आहेत, त्यामुळे दिवसेंदिवस भारत-कॅनडा यांच्या संबंधात तणाव वाढत चालला आहे. कॅनडातील हिंदू लोकांची सुरक्षितता हा चिंतेचा विषय बनला आहे. भारतीय मूळ वंशाचे असलेले कॅनडामधील खासदार चंद्र आर्य यांनी खलिस्तानी कारवायांपासून कॅनडातील अल्पसंख्य असलेल्या हिंदूंना धोका निर्माण होऊ शकतो. हिंदू सध्या भयभीत आहेत, असे म्हटले आहे.

खलिस्तानी कारवाया वाढत असतानाच गुरपतसिंह पन्नू याने कॅनडातील हिंदूंनी भारतात निघून जावे अशी धमकी दिल्यानंतर कॅनडा सरकारने मात्र या देशात द्वेष व मत्सर याला जागा नाही असे स्पष्ट केले आहे. निज्जार हत्येप्रकरणी भारताने कॅनडाला तपासात सहकार्य करावे असे अमेरिकेने म्हटले आहे. त्याच अमेरिकेत शीख फॉर जस्टिसचा प्रमुख गुरपतवंत पन्नू अमेरिकन नागरिक म्हणून राहात आहे. भारताने त्याला फरार म्हणून घोषित केले आहे. भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टिगेटिव्ह एजन्सीने त्याची अमृतसर व चंदिगढमधील मालमत्ता जप्त केली आहे. कॅनडा सरकार ज्या पद्धतीने तेथील खलिस्तानवाद्यांची बाजू घेत आहे ते पाहता तोच भस्मासूर कॅनडाच्या सरकारला भविष्यात भारी पडू शकतो. कॅनडामध्ये खलिस्तानवाद्यांनी हिंसाचार सुरू केला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? नवा भिंद्रानवाले निर्माण होण्यापूर्वीच कॅनडाने वेळीस सावध व्हावे?

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

टुडेज् ब्लॉग

# नवरात्रीतील यंदाचे नवरंग

**नवरात्रीचे नऊ रंग कसे ठरवले जातात प्रत्येक रंग काय दर्शवतो?**

नवरात्र जवळ आली आहे आणि त्यामुळे नवरंगांचे कपडे परिधान करण्यासाठी कपड्यांची जमवाजमव देखील सुरु झाली आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांचे रंग दरवर्षी बदलत असतात. लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांमध्ये या नवरंगांनुसार वस्त्र परिधान करण्याचा उत्साह पाहायला मिळतो. स्त्रियांना वेगवेगळ्या रंगांचे कपडे घालण्याची प्रचंड हौस असते.

नवरात्रीतल्या नवरंगांमुळे त्यांची ही हौस पूर्ण होते. यामागे कोणतीही धार्मिक भावना नसली तरी या काळात एकाच रंगाचे कपडे परिधान केल्यामुळे सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होते. पण हे रंग कसे ठरवले जातात? प्रत्येक रंग काय दर्शवतो? याविषयी जाणून घेऊयात आजच्या लेखात

**रविवार, १५ ऑक्टोबर :** उगवत्या सूर्याचा रंग केशरी म्हणून रविवारचा रंग केशरी. रविवारी केशरी रंग परिधान करून देवी नवदुर्गाची पूजा केल्याने व्यक्तीला उबदारपणा आणि उत्साह यासारखे गुण प्राप्त होतात. हा रंग सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण असतो आणि व्यक्तीला उत्साही ठेवतो.

**सोमवार, १६ ऑक्टोबर :** चंद्र पांढरा म्हणून सोमवारचा रंग पांढरा. पांढरा रंग शुद्धता आणि निर्दोषपणाचे प्रतीक आहे. देवीच्या आशीर्वादासाठी पात्र होण्यासाठी सोमवारी पांढरा रंग परिधान करतात आणि आंतरिक शांती आणि सुरक्षिततेची भावना अनुभवतात.



**मंगळवार, १७ ऑक्टोबर :** मंगळ लाल म्हणून मंगळवारचा रंग लाल. मंगळवारी, नवरात्रौत्सवासाठी लाल रंगाचे कपडे घालतात. लाल रंग उत्कटतेचे आणि प्रेमाचे प्रतीक आहे आणि देवीला अर्पण केलेल्या चुनरीचा सर्वात पसंतीचा रंग देखील आहे. हा रंग माणसाला जोम आणि चैतन्य देतो.

**बुधवार, १८ ऑक्टोबर :** बुधवारी रॉयल ब्लू म्हणजेच निळ्या रंगाचे कपडे परिधान केले जातात. निळा रंग हा समृद्धता आणि शांतता दर्शवतो.

**गुरुवार, १९ ऑक्टोबर :** नवरात्रीच्या दिवसाचा अतुलनीय आशावाद आणि आनंदाने सुरुवात करण्यासाठी गुरुवारी पिवळा रंग परिधान केला जातो. हा एक उबदार रंग आहे जो दिवसभर व्यक्तीला आनंदी ठेवतो.

**शुक्रवार, २० ऑक्टोबर :** शुक्रवारी हिरवे कपडे परिधान केले जातात. हिरवा रंग निसर्गाचे प्रतीक आहे आणि वाढ, आणि शांततेची भावना जागृत करतो. हिरवा रंग जीवनातील नवीन सुरुवातीचे देखील प्रतिनिधित्व करतो.

**शनिवार, २१ ऑक्टोबर :** शनिवारी राखाडी रंगाचे कपडे परिधान केले जातात. राखाडी रंग संतुलित भावनांचे प्रतिनिधित्व करतो आणि व्यक्तींचे पाय जमिनीवर ठेवतो.

**रविवार, २२ ऑक्टोबर :** जांभळा रंग लक्झरी, भव्यता आणि खानदानीपणाशी संबंधित आहे. जांभळा परिधान करून नवदुर्गाची पूजा केल्याने भक्तांना ऐश्वर्य प्राप्त होते. म्हणून, देवीचा आशीर्वाद घेण्यासाठी रविवारी जांभळ्या रंगाचे कपडे परिधान केले जातात.

**सोमवार, २३ ऑक्टोबर :** मोरपिसी रंग विशिष्टता आणि व्यक्तिमत्व सूचित करते. नवरात्रीच्या नवव्या दिवशी निळ्या आणि हिरव्या रंगाची ही उत्कृष्ट छटा या दोन्ही रंगांशी संबंधित गुण जसे की करुणा आणि ताजेपणा दर्शविते.

जन्म हा अखेरचा

# सेव्यस्थल



त्याचप्रमाणे ज्या मनुष्याच्या ठिकाणी उत्तम गुण असतात, त्यांचीही पूजा केली जाते. 'गुरु' याचा अर्थ गुणवान. जो उत्तम गुणांनी मंडित असतो तो गुरु होय. गुरुच्या ठिकाणी ज्ञान हा सर्वोत्कृष्ट गुण असतो. 'गु' म्हणजे अज्ञान, 'रु' म्हणजे निवारण करणारा. ज्ञानोपदेशाने अज्ञान दूर करण्याचे सामर्थ्य ज्याच्या अंगी असते, तो 'गुरु' होय. गुरुपदेश श्रवण करणारा हळूहळू स्वत: गुरुच होतो. सामान्यत: ज्याच्याजवळ आपण बसतो, त्याचा प्रभाव आपल्यावर पडत असतो. कालचा विद्यार्थीच आज शिक्षक झालेला असतो. हा शिक्षकाच्या सानिध्याचा प्रभाव असतो. गुरुपदेश हा अमृतासारखा असतो. स्वर्गामध्ये अमृत असते. चंद्रकिरणात अमृत असते; असे आपण ऐकत-वाचत असतो. त्या सर्वांपेक्षा गुरुवचनातील अमृत श्रेष्ठ होय. संमुद्रमंथनातून अमृत निघाले. परंतु त्या अमृतामुळे समुद्राचे खारट पाणी मधुर झाले नाही. चंद्रकिरणात अमृत आहे असे म्हणतात. त्या अमृतामुळे चंद्राला झालेला क्षयरोग बरा झाला नाही. स्वर्गात अमृत आहे असे म्हटले जाते. परंतु स्वर्गस्थ देवांना आपले पुण्य क्षीण होऊन देवलोक सोडावा लागेल, असे भय असते. मग काय असे अमृत काय कामाचे? म्हणून जीवाला अमृतत्त्व म्हणजे मोक्ष मिळवून देते, असे गुरुवचनामृतच सर्वश्रेष्ठ होय. या अमृतामुळे जन्ममरणातून सुटका होते. गुरुची अशी अमृतवाणी जो श्रवण करतो, त्याला ज्ञानरुपी श्रेष्ठ फल प्राप्त होते.

ज्ञान हे सर्व फळांत सर्वश्रेष्ठ फळ होय. त्याचा कधीही नाश होत नाही. म्हणून त्याला अक्षय फल म्हणतात. एकदा आत्मज्ञान झाले की ते ज्ञान नाश पावत नाही. हे महाफल ज्या शिष्याला प्राप्त होते, तो गुरुप्रमाणेच इतरांकडून सेवा करण्यास योग्य असा 'सेव्य' होतो.

गुरुपदिष्टे विज्ञाने चेतसि स्थिरतां गते ।

साक्षात्कृतशिव: शिष्यो गुरुवत् पूज्यते सदा ।।१७.८२।।

गुरुचा उपदेश जेव्हा शिष्याच्या मनात स्थिर होतो तेव्हा शिष्याला शिवसाक्षात्कार होऊन तो गुरुप्रमाणे पूज्य होतो. 'तू शिव आहेस' असाच उपदेश गुरु करतात. सुवर्णाच्या अलंकारामध्ये जसे सोने असते, त्याप्रमाणे या विश्वामध्ये शिव भरुन राहिलेला असतो. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# जगात अनेक कंपन्यांचे प्रमुख भारतीय

जगात अनेक कंपन्यांचे मुख्य सीईओ किंवा प्रमुख भारतीय लोक आहेत. संघटना कौशल्य व्यवस्थापनातील निपुणता त्या विषयांचे ज्ञान, व शिक्षण यांच्या जोरावर हे अधिकारी सर्वोच पदावर पोहचले आहेत. खरे तर ही बाब साऱ्या भारतीयांच्या दृष्टीने अभिमानची व गौरवाची आहे. वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्सने २१ बलाढ्य कंपनीची एक यादीच नुकतीच प्रसिद्ध केली आहे. या कंपन्यांच्या प्रमुख पदावर बहुतेक भारतीय आहेत. जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा भारतीय आहेत. ज्यामध्ये प्रमुख पदावर भारतीय आहेत त्या कंपन्या अशा आहेत. मायक्रॉन, ॲडोब, मायकोसॉफ्ट, गुगल, आयबीएम, युट्यूब, हनीवेल, मोटोरोला, मोबिलिटी स्टारबक्स, फ्लेक्स, नेट अप कॉग्निझंट इत्यादी यातील अनेक कंपन्या जगद्विख्यात आहेत व अब्जावधी डॉलर्सची त्यांची उलाढाल आहे. हे खरे तर भारताचे टॅलेंट आहे. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक हे भारतीय आहेत तर अमेरिकेच्या उपाध्यक्षा कमला हॅरिस भारतीय वंशाच्या आहेत. असे अनेक नेते व कंपन्यांचे मुख्य भारताचे नाव परदेशात मोठे करत आहेत. याबरोबरच जगात भारतीय नेतृत्वाची सुद्धा प्रशंसा होत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगातील एक प्रभावशाली नेते म्हणून ओळखले जातात. गेले काही वर्षे त्यांचा जगातील सर्वात प्रभावशाली नेते म्हणून गौरव होत आहे. एकूणच जागतिक पटलावर अनेक भारतीय चमकत आहेत.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# गरिबी निर्मूलन योजनांना प्राधान्य द्यावे


आपण जगाची आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचा विचार करत आहोत ही चांगली गोष्ट आहे. पण हे शक्य व्हायला दोन-तीन दशकांहून अधिक काळ लागू शकतो. हा प्रश्न देशवासियांच्या मनात निर्माण होणे साहजिक आहे की, देश महासत्ता झाला तर देशातील ८० कोटी गरीब जनता ज्यांना मोफत रेशन दिले जात आहे ते गरिबीतून मुक्त होऊ शकतील की नाही? तरुणांना बेरोजगारी आणि जनतेला महागाईपासून मुक्ती मिळेल का? श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी होईल का? आर्थिक महासत्ता झाल्यामुळे गरिबी, बेरोजगारी आणि महागाई वगैरे दूर होईल, असे वाटत नाही. आपली अर्थव्यवस्था कोलमडून जाण्याआधी आणि देश कर्जाच्या ओझ्याखाली दबून जाण्यापूर्वी गरिबी निर्मूलनाच्या योजनांना प्राधान्य दिले पाहिजे.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

# पर्यावरणाची हानी कशी रोखणार?

अंमली पदार्थांची तस्करी, बनावट औषधे, खाद्यपदार्थांचा व्यापार, लहान मुलांची आणि महिलांची तस्करी, जुगार आणि सावकारी या जशा गुन्हेगारीशी निगडित बाबी आहेत, तसेच पर्यावरणाशी संबंधित गुन्हे या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यातून गुन्हेगार बक्कळ पैसा कमावत आहेत. गुन्हेगार पर्यावरणाची हानी करून पैसे गोळा करत आहेत. त्याच वेळी पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्यांच्या हत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे.

मेझॉनचे जंगल हे जगातील सर्वात मोठे रेन फॉरेस्ट आहे. जगाला मिळणाऱ्या एकूण ऑक्सिजनपैकी २० टक्के ऑक्सिजन येथून येतो. याला पृथ्वीचे फुप्फुस असेही म्हणतात; पण गेल्या दशकभरात या फुप्फुसांचे झपाट्याने नुकसान झाले. नुसती जंगले तोडली गेली नाहीत, तर तिथे राहणाऱ्या वस्त्याही नष्ट केल्या गेल्या. विरोध करणाऱ्यांना मारले गेले. या लाकडांची तस्करी जगातील विकसित देशांमध्ये केली जात होती. असे गुन्हे सातत्याने घडत आहेत. यामध्ये छोट्या टोळ्या नसून संघटित गुन्हेगारी गट काम करतात. याला इकोसाइड म्हणजेच पर्यावरणाची हत्या म्हटले जात आहे. खुनाला शिक्षा असते. मग पर्यावरणाची हत्या करणाऱ्यांना शिक्षा का होत नाही? झाडे तोडताना किंवा नद्यांमध्ये घाण टाकताना मानववर तसेच संपूर्ण पर्यावरणावर परिणाम होत आहे. या तर्काने जगभरातील पर्यावरण कार्यकर्ते एकत्र येत आहेत. युद्धगुन्हा आणि नरसंहाराप्रमाणे इकोसाइडलाही गुन्ह्याच्या श्रेणीत ठेवावे, अशी त्यांची मागणी आहे. इकोसाइड' हा शब्द अमेरिका-व्हिएतनाम युद्धात प्रथम वापरला गेला. अमेरिकेने व्हिएतनामच्या नद्या आणि जमीन प्रदूषित करण्यासाठी एक विशेष प्रकारचे विषारी तणनाशक पसरवले.



इंटेलिजन्सच्या भाषेत त्याला 'एजंट ऑरेंज' म्हटले जात होते. अमेरिकेने शत्रू देशाला पराभूत करण्यासाठी त्या देशाच्या मातीत आणि पाण्यात विष टाकले होते. पर्यावरणीय गुन्हा ही एक विस्तृत श्रेणी आहे. त्यातील पहिला वन्य जीव गुन्हा आहे. यामध्ये झाडे आणि जंगलात राहणारे प्राणी या दोघांचेही नुकसान होते. बेकायदेशीर खाणकामही गुन्ह्यामध्ये मोडते. बेकायदेशीर मासेमारी आणि प्रदूषण पसरवणे हे पर्यावरणाच्या विरोधात केल्या जाणाऱ्या कारवायांच्या श्रेणीत येतात. या सगळ्यांना मिळून 'इकोसाइड' म्हणतात.

कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावणे हा पर्यावरणीय गुन्हा आहे. त्याद्वारे गुन्हेगार भरपूर पैसा कमावत आहेत. यामध्ये सामान्य बायोडिग्रेडेबल' कचरा तसेच सिरिंज, सदोष इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि खराब झालेली औषधे यांचा समावेश होतो. त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून ते पृथ्वी किंवा प्राण्यांना इजा करणार नाहीत. प्रत्येक देशात यासाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे आहेत; परंतु पैसे वाचवण्यासाठी गुन्हेगारी संघटना हा कचरा बेकायदेशीरपणे उचलतात आणि इतर देशांमध्ये टाकतात. फिलिपिन्स, घाना, नायजेरिया, व्हिएतनाम, पाकिस्तान आणि बांगलादेशमधून अशा अनेक तक्रारी आल्या की, विघटन न करता येणाऱ्या कचऱ्याचे डोंगर उभे राहात आहेत. युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम' (यूएनईपी) नुसार, सुमारे १२ अब्ज डॉलर किमतीचा बेकायदेशीर कचरा दर वर्षी केवळ अमेरिकेतून तस्करी केला जातो. इंटरपोलने २०१८ मध्ये कबूल केले होते की, कचऱ्याच्या तस्करीच्या प्रत्येक शिपमेंटमधून तस्करांना लाखो डॉलर्सचा फायदा होतो. यामध्येही प्लास्टिकचा कचरा सर्वाधिक आहे. श्रीमंत देशांनी त्यांचा कचरा गरीब देशांमध्ये सोडू नये, यासाठी आंतरराष्ट्रीय करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्याला 'बेसल कन्व्हेन्शन' असे नाव देण्यात आले. १९८९ पासून आतापर्यंत १८८ देशांनी याला सहमती दर्शवली आहे. कचऱ्याची तस्करी थांबवण्याबरोबरच कचऱ्याची विल्हेवाट आणि नियंत्रणाचाही यात समावेश आहे; मात्र या कराराने फारसा फरक पडला नाही. हे पाहता २०१९ मध्ये आणखी काही सुधारणाही करण्यात आल्या. यानंतरही गरीब देश श्रीमंत देशांसाठी डस्टबिन ठरले आहेत. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे खूप महाग असल्याने सरकारेदेखील याकडे अनेकदा डोळेझाक करतात. (पूर्वार्ध)

**- भास्कर खंडागळे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त...



### पंढरपूर नगर परिषदेच्यावतीने 'मेरी मिट्टी मेरा देश'ची अमृत कलश रॅली

रपंढरपूर : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'मेरी मिट्टी मेरा देश' या उपक्रमांतर्गत अमृत कलश रॅली काढण्यात आली. या अंतर्गत मिट्टी को नमन और वीरो को वंदन हे अभियान संपूर्ण देश व राज्यांमध्ये राबविण्यात येत आहे. नगर परिषदेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक, गोपाळ कृष्ण मंदीर, नामदेव पायरी व पुन्हा पश्चिमद्वार, चौफळामार्गे राष्ट्रमाता जिजामाता उद्यान, हुतात्मा स्मारकापर्यंत ही रॅली काढण्यात आली.याचा समारोप हुतात्मा स्मारक येथे करण्यात आला. यावेळी हुतात्मा भगतसिंग व शहिदांच्या स्मारकाचे पूजन मुख्याधिकारी अरविंद माळी यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्याधिकारी ॲड.सुनील वाळूजकर, पंढरपूर नगर परिषदेचे माजी उपनराध्यक्ष व भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक अनिल अभंगराव, भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक विक्रम शिरसट, माजी नगरसेवक डी.राज सर्वगोड, नवनाथ रानगट, विवेक परदेशी, सामजिक कार्यकर्ते धर्मराज घोडके,नरेंद्र डांगे उपस्थित होते.

### महिला पोलिसास मारहाण; दोन महिलांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर** : मोहोळ पोलीस ठाण्यात जाऊन शिवीगाळ करीत महिला पोलीस कर्मचाऱ्यास धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा केल्याच्या आरोपातून मालती सिद्राम टेळे (रा. टेळेवस्ती,मोहोळ) आणि यमुना विष्णू इंगळे (रा. मोरवंची ता. मोहोळ) या दोघींना गुन्हा शाबीत न झाल्याने निर्दोष मुक्त करण्याचा आदेश अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश संगीता शिंदे यांनी नुकताच दिला आहे. दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी मोहोळ पोलीस स्टेशनचे कर्मचारी हे विलास टेळेच्या अटक वॉरंट बजावणीसाठी टेळे वस्ती मोहोळ येथे गेले होते. त्यावेळी यमुना इंगळे आणि मालती टेळे यांनी पोलिसांशी हुज्जत घातली. त्यांना नोकरी घालवण्याची धमकि दिली होती. त्यानंतर मोहोळ पोलीस स्टेशन येथे येऊन उपनिरीक्षक राठोड यांना तुम्ही आमचे घरी कसे काय आला, आम्ही मर्डर केले का? असे म्हणत त्यांना शिवीगाळ केली आणि त्यांची कॉलर पकडली. यमुनाने महिला कॉन्स्टेबलचा हात पिरगाळला. दोघींनी सरकारी कामात अडथळा निर्माण केला. अशा आशयाची फिर्याद महिला कॉन्स्टेबल ए.डी.लवटे यांनी मोहोळ पोलिसात दिली होती. या खटल्यात सरकार पक्षातर्फे ९ साक्षीदार तपासण्यात आले. दरम्यानच्या काळात मालती टिळे यांचे निधन झाले. मुळात अटक वॉरंट हे मालती टेळे हिच्या मुलाविरुद्ध काढण्यात आले होते. तिचा मुलगा टेळे वस्ती येथे राहत नाही. ही बाब पोलिसांनी उलटतपासात मान्य केली आहे, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांनी मांडला होता. या खटल्यात आरोपींतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिध्दाराम पाटील तर सरकारतर्फे ॲड.दत्तुसिंग पवार यांनी काम पाहिले.

### चिंचोलीकाटीच्या माजी सरपंचावर ग्रामपंचायत फसवणूक प्रकरणी गुन्हा

**मोहोळ** : तालुक्यातील चिंचोली काटी येथे माजी सरपंचाने ग्रामपंचायतच्या साऱ्यापोटी ८७ हजार रुपये रक्कम घेऊन त्यास बनावट शिक्के करून बोगस पावती दिली व ती रक्कमही ग्राम पंचायतकडे भरली नाही म्हणून त्यांचेवर मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार चिंचोली काटी ग्रामपंचायत सरपंच म्हणून चैताली राजेश पाटील या काम पाहत आहेत. या गावच्या हद्दीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या कंपन्या जास्त प्रमाणात असून त्या कंपन्याकडून ग्रामपंचायतीच्या साऱ्यापोटी ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळते. या गावांमध्ये गावच्या हद्दीमध्ये रसायन ड्रग्ज प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी आहे. या कंपनीकडे ग्रामपंचायतची एक लाख ४७ हजार ४७० रुपये एवढी थकबाकि होती, ही थकबाकि भरणा करण्यासाठी २८ फेब्रुवारी २०२२ रोजी दिवाणी न्यायालय मोहोळ यांचेकडे सहाय्यक अधीक्षक मार्फत १२ मार्च २२ रोजी थकबाकि भरून तडजोड करू शकता म्हणून नोटीस दिली होती. लोक अदालत येथे हजर हाण्याकरिता रसायन ड्रग्ज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजर संतोष अक्कल हे आले होते व त्यांनी ग्रामपंचायतीच्या कराची ८७ हजार रुपये थकबाकि माजी सरपंच चंद्रकांत सूर्यभान नागणे यांची हातात देऊन तशी पावती घेतली असल्याचे सांगितले. याबाबत त्या पावतीची शक्यता पडताळून पाहिली असता सध्याचे ग्रामसेवक ग्रामपंचायत शिपाई व पंचायत समितीचे चौकशी अधिकारी यांनी सत्यता पडताळून पाहिली असता सदर पावती ही बोगस असल्याची लक्षात आले. त्यानुसार याबाबत माजी सरपंच चंद्रकात सुर्यभान नागणे यानी बनावट पावती देवून ग्रामपंचायतची फसवणूक केल्याप्रकरणी चंद्रकात सुर्यभान नागणे यांचेवर ग्रामपंचायतचे बनावट शिक्के तयार केले. ग्रामपंचायतची फसवणूक केली म्हणून विद्यमान सरपंच चैताली राजेश पाटील यांनी फिर्याद दाखल केली. चंद्रकात नागणे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दिवाळी नंतर वीजग्राहकांना बसणार स्मार्ट मिटरचा शॉक

**सोलापूर** : थकबाकि खोळंबली असल्याने महावितरणचे अर्थकारणच विस्कळीत झाले आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी राज्यात स्मार्ट प्रीपेड वीजमीटर लावण्यात येणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रियादेखील पूर्ण झाली असून, चार कंपन्यांना कंत्राट देण्यात आले आहे. राज्यभरात २,२४,६१,३४६ मीटर बदलले जातील. हा प्रकल्प एकूण २६,९२३.४६ कोटींचा आहे. चारही कंपन्यांना वेगवेगळ्या विभागाचे कंत्राट मिळाले आहे. दिवाळीनंतर मीटर बदलण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे सांगितले जात आहे.

## निधन वृत्त

### ललिता येमूल



**सोलापूर** : अशोक चौकातील रहिवासी ललिता अंबादास येमूल यांचे बुधवार, दि. ४ ऑक्टोबर २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, सुना, नातू असा परिवार आहे.

### पार्वती ग्यामलानी



**सोलापूर** : गुरुनानक नगर येथील रहिवासी पार्वती उत्तमचंद ग्यामलानी (वय ८४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातू नातवंडे असा परिवार आहे.

# साडेचार हजार सोलापूरकरांनी पाहिले शिवकालीन शस्त्रास्त्र

## तलवार, भाले, दांडपट्टा, वाघनखांचा समावेश

**सुराज्य/सोलापूर**



जुळे सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालयात आयोजित शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाला गुरुवारी पहिल्याच दिवशी साडेचार हजार लोकांनी भेट दिली. त्यात विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. शाळा सुटल्यानंतर सायंकाळी मंगल कार्यालयाच्या बाहेर अक्षरश: मोठी रांग लागलेली होती.

गोकूळ दूध संस्थेचे अध्यक्ष अरुण डोंगळे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांची प्रमुख उपस्थिती होती. आयोजक रवी मोहिते यांनी प्रदर्शनाच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट केला.

शुक्रवारी शस्त्रे पाहण्याचा शेवटचा दिवस आहे. सकाळी नऊ ते रात्री आठपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असल्याचे मोहिते यांनी सांगितले.

या प्रदर्शनात बार्शी येथील माधवराव देशमुख यांनी काही शस्त्रास्त्रे संग्रहीत केली आहे. काही शास्त्रात कोल्हापूरवरून आणली आहेत. यामध्ये मराठा तलवार, भाले, दांडपट्टा, वाघनखं, धूप तलवार, जाफराबादी तलवार, मराठा तलवार, मोगल तलवार, रजपूत तलवार यासह इतर विविध प्रकारच्या तलवारी आहेत. याशिवाय कासवाच्या पाठीची आणि हत्तीच्या पाठीची कातडीची ढाल, लोखंडी धातूची ढाल, तोफेचे दगडी गोळे, विविध शस्त्रास्त्रे ठेवण्यात आली आहेत. शिवराज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त कोल्हापूर येथील गोकूळ दूध संघाच्या पुढाकाराने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनातील विविध शस्त्रांच्या माहितीचे फलक लावण्यात आले आहेत. काही इतिहासप्रेमी युवक विद्यार्थ्यांना त्याची माहिती देत होते.



# 'आशां'ना ऑनलाईनची सक्ती नकोच; आंदोलनाचा इशारा

**सुराज्य/सोलापूर**

तुटपुंज्या मोबदल्यात विविध कामांची जबाबदारी पेलवणाऱ्या आशा व गटप्रवर्तकांना कोणत्याही प्रकारच्या ऑनलाईन कामाची सक्ती करण्यात येवू नये. अन्यथा सरकारशी गाठ राहील, अशा इशारा देत माजी आमदार नरसय्या आडम मास्तर हे याच्या निषेधार्थ धरणे आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. लाल बावटा, आशा स्वंयसेविका व गट प्रवर्तक युनियनच्यावतीने त्यांच्या न्याय, हक्काच्या मागण्यांबाबत जिल्हा परिषद पूनम गेटसमोर धरणे आंदोलन केले. त्यावेळी आडम मास्तर बोलत होते.

यावेळी युनियनच्या नेत्या कॉ. पुष्पा पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांना शिष्टमंडळाद्वारे विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. आडम मास्तर म्हणाले, आरोग्य विभागात काम करणाऱ्या आशा व गटप्रवर्तक हे सर्वकाम विविध भागात फिरून करतात. त्यांना कामावर आधारीत मोबदला मिळतो. त्यांना अतिशय तुटपुंजा मोबदला मिळतो. सद्यपरिस्थितीमध्ये त्यांच्यावर विनामोबदला अनेक कामे लादण्यात येत आहेत. दबाव टाकून ही कामे करून घेतली जात आहेत. तसेच ऑनलाईन कामाच्या संदर्भात आशा व गटप्रवर्तकांच्या अडचणी व त्यांच्यावर असलेल्या इतर कामांची जबाबदारी यांचा विचार न करता आपल्या आशा व गटप्रवर्तकांना कोणत्याही ऑनलाईन कामाची सक्ती करण्यात येऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली.

केंद्र व राज्य स्तरावर आपल्यावतीने शिफारस करून त्यांच्या मागण्यांना मान्य करावात ही प्रमुख मागणी घेऊन सिटूचे राज्य महासचिव डी.एम.एच.शेख यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.

या शिष्टमंडळात कॉ. रुपाली दोरकर, कॉ. सिध्दाराम उमराणी आदींचा समावेश होता.

# पीकअपखाली चिरडून एकाच खून

## पंढरपूर ग्रामीण पोलीस गुन्हा दाखल, दोघांना घेतले ताब्यात, एक फरार

**सुराज्य/पंढरपूर**

भावकीतील शेतजमिनीच्या वादातून दुचाकीवरून जाणाऱ्या चुलत भावांना पाठीमागून टेम्पोने धडक देऊन खुनाचा प्रयत्न केल्याची घटना सुपली (जैनवाडी,ता. पंढरपूर) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी जखमींच्या चुलत भावासह तिघाविरुध्द खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

महेश नामदेव जाधव आणि त्याचा भाऊ सुग्रीव जाधव (दोघे रा.जैनवाडी ता. पंढरपूर) अशी गंभीर जखमी झालेल्या दुचाकी चालकांची नावे आहेत. या संदर्भात त्यांचे वडील ज्ञानोबा नामदेव जाधव (वय ६८) यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अंकुश जाधव, त्याचा भाऊ सतीश तुकाराम जाधव आणि सचिन मनोहर लिंगडे (सर्व रा.जैनवाडी) या तिघांवर गुन्हा दाखल केला.

ज्ञानोबा नामदेव जाधव (वय ६८) यांची जैनवाडी शिवारात गट क्रमांक १२१,११९ शेती आहे. या शेतीच्या वाटणीवरून फिर्यादी व त्याचा भाऊ तुकाराम यांचात वाद सुरु आहे. परस्परविरुद्ध चालू असलेल्या फौजदारी केसच्या तारखा कोर्टात सुरु आहेत. दरम्यान गुरुवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी यातील फिर्यादीची मुले महेश जाधव व सुग्रीव जाधव कोर्टात हजर राहून मोटरसायकलवरून पंढरपूर येथून गावी जैनवाडी येथे परत येत होते.

दरम्यान, (एम.एच.१३ इ.क्यू. ५८७५) या क्रमांकाच्या मोटारसायकलला (एम.एच.१२ इ.क्यू. डबल्यू. ८५९७) या क्रमांकाच्या पीकअपने ठोकरले. पीकअप चालक अंकुश तुकाराम जाधव व त्यांच्यासोबत असलेले संतोष तुकाराम जाधव, सचिन मनोहर लिंगडे यांनी संगनमताने त्यांचा पाठलाग करून बुधवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मोटरसायकलला पीकद्वारे ठोकरले. यात मोटारसायकलीवरील दोघांनाही पीकअपने अंदाजे १०० ते १५० मीटर फरफटत नेले. यात ते गंभीर जखमी झाले. यात एकाचा मृत्यू झाला. दरम्यान, त्यांच्या मदतीला अन्य लोक धावून येत असल्याचे पाहून आरोपींनी पलायन केल्याचे हे पाहून पळून गेले, अशी फिर्याद पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली आहे.

# सावकाराच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याने केला आत्महत्येचा प्रयत्न

## ईश्वर वठार येथील घटना;सावकारांविरुद्ध गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

सावकाराच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना ईश्वर वठार (पंढपूर) येथे घडली. या प्रकरणी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात सावकारांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

शेतकरी रामदास लाडजी देशमुख हा शेतकरी जर्सी गायींसह शेती व्यवसायावर उपजीविका करीत आहे. त्याने जर्सी गायी घेणे आणि इतर शेतीकामासाठी काही खाजगी सावकाराकडून पैसे घेतले होते. परंतु, व्याज, मुद्दल देऊनसुद्धा तो खाजगी सावकार त्याला धमक्या देत होता. त्याच्या घरी जाऊन बसत. जनावरे ओढून नेण्याची धमकि देत होता. सावकाराच्या या त्रासाला कंटाळून व दारातील जर्सी गायी ओढून नेल्या तर गावामध्ये मानहानी होईल, या भीतीने त्याने गुरुवारी सकाळी कांदा पिकावरील फवारणीचे विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. घराशेजारील लोकांनी त्याला तात्काळ पंढरपुरातील खाजगी हॉस्पिटल उपचारासाठी दाखल केले. त्याची प्रकृती चिंताजनक आहे. भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर यांनी तात्काळ त्या कुटुंबियांच्या मदतीला धावले. त्यांना धीर दिला. दरम्यान, पोलीस प्रशासनाने अशा सावकारांचा बंदोबस्त करावा, अशी मागणीही त्यांनी केली.


## अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट

जा.क्र.२०२३ /न.प.अ./पापु- १२/संकलन -१/ कावि ७४७/आरआर - दिनांक - ०५/१०/२०२३

अक्कलकोट नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडील खालील नमुद केलेल्या कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडुन सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामाबाबतच्या संपुर्ण तपसील व अटी शर्ती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त) नगर परिषद पाणी पुरवठा विभागाकडे पहावयास मिळु शकेल. कोरे निविदा फॉर्म अभिलेख कार्यालयात मिळतील. कार्यालयात ठेकेदारांनी रोख रक्कम भरणे आवश्यक आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजीत किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा प्रकार व किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | हालचिंचोळी पंप हाऊस येथील ९० एच पी पंप दुरुस्ती करणे, ट्रान्सफॉर्मर रिवायडिंग व दुरुस्ती करणे, ए बी स्विच व मिटरिंग सिस्टम बसवुन ट्रायल टेस्ट देणे | रु. ९०००००/- | १००००/- | १५ दिवस | ब-१ रु. १०००/- |

वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०६/१०/२०२३ पासुन दि. १७/१०/२०२३ अखेर पर्यंत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवसी दुपारी १.०० वाजेपर्यंत मिळतील. बयाणा रक्कम स्वीकारण्याची अंतिम तारीख १७/१०/२०२३ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील. बयाणा रक्कम रोखीने भरणेचे आहे. बयाणा रक्कम भरलेशिवाय निविदा स्विकारले जाणार नाही. सीलबंद निविदा दि. १७/१०/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्वीकारले जातील.सीलबंद निविदा नगरपरिषद कार्यालयात आवक जावक यांचेकडे समक्ष आणून देणेतय यावे. निविदेसंबंधी आवश्यक असलेली सर्व तांत्रिक कागदपत्रे एका लिफाफ्यामध्ये (लिफाफा - अ) सीलबंद करणेचे आहे व भरलेली निविदा फॉर्म दुस-या लिफाफ्यामध्ये (लिफाफा -ब) सीलबंद करुन सादर करणेचे आहे किंवा दोन्ही लिफाफे मिळून मोठ्या लिफाफ्यामध्ये एकत्रितरित्या सीलबंद करुण देणेचे आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. दाखल झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवसी सायं ५.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क नगरपरिषदेला राहील. त्याची कारणे देणे नगरपरिषदेला बंधनकारक राहणार नाहीत..निविदासंबंधी लागू असलेले नगरपरिषदेचें सर्व नियम मक्तेदारांवर बंधनकारक राहतील. बयाणा रकमेची मुळ पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही. वरील कामांकरिता निधी उपलब्धतेनुसार बिले अदा करणेत येतील.

सही/-
श्री.सचिन पाटिल
मुख्याधिकारी
नगरपरिषद अक्कलकोट



महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी

दुरध्वनी क्र. ०२१८३-२२३२६१ ईमेल-sdomadha@gmail.com

क्रं. भूसंपादन/कावि/२२८/२०२३ दिनांक २०/०९/२०२३

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग भिमानगर यांचेकडील **सीना माढा उपसा सिंचन योजना निमगांव वितरिका क्रं. १ वरील खडकेवस्ती लघु वितरीका सा.क्रं.०/००० ते २/००० करिता मौजे कन्हेरगांव ता. माढा जि. सोलापूर** येथील जमीनी ( सोबत अनुसूचीप्रमाणे) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, मंत्रालय मुंबई दि. १२ मे २०१५ व क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ-२ दि. ३० सप्टेंबर २०१५ प्रमाणे व शासन परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दि. २५ जानेवारी २०१७ मध्ये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित आहे.

सदर बाबत जमीनीतील हक्क, हितसंबंध हरकत असल्यास वा जमिनीच्या अनुषंगाने म्हणणे मांडावयाचे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी लेखी म्हणणे तक्रार / हरकत समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायं. ५.४५ वाजेपर्यंत) पोहचेल अशारितीने उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी या कार्यालयाकडे सादर करावी. अन्यथा खालील अनुसूचित स्तंभ ३ मध्ये नमूद जमीन ( गट नंबर) स्तंभ २ मध्ये नमूद भूधारकांची मिळकत निर्वेध व जोखीम मुक्त असल्याचे समजण्यात येईल. दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही.

**संपादक संस्थेचे नांव :- कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भीमानगर**

**भूसंपादनाचे प्रयोजन :- सीना माढा उपसा सिंचन योजनेअंतर्गत निमगाव वितरिके वरील क्र. १ वरील खडकेवस्ती लघु वितरिका सा.क्र. ०/००० ते २/००० करिता, मौजे कन्हेरगाव, ता. माढा, जि. सोलापूर एस आर १४/२०२३.**

### अनुसूची

| अ.क्र. | भूधारकांचे नांव | गट नंबर | भूधारणा पध्दती | गांव नमुना नं. ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गणपत जगन्नाथ पवार, अनुसया गोरख इंगळे, सोमनाथ गोरख इंगळे, ऋतूराज भिमराव मोरे, बालाजी गौतम इंगळे, समाधान गौतम इंगळे, श्रीकांत अर्जुन मोरे, शिरीष नारायण मोरे, विकास नारायण मोरे, आनंद पंडीत मोरे, पंडीत वामन मोरे | १८२ | भोगवटदार वर्ग १ | १३.८६ | ०.८५ |
| २ | अशोक हणमंत मोरे, हरीदास हणमंत मोरे, महावीर हनुमंत मोरे, उत्तम हनुमंत मोरे | २३४ | भोगवटदार वर्ग १ | ५.६७ | ०.२३ |
| ३ | संतोष विठ्ठल खटके, माधुरी मनोज काळे, मनोज दत्तात्रय काळे, कांचन विजय मोरे | १८३ | भोगवटदार वर्ग १ | ८.१० | ०.०१ |
| ४ | गोविंद विजय केदार, मिनाक्षी विनोद काकडे, वनिता नागनाथ मोरे, शिवाजी महादेव डोके, सुमन दिगंबर केदार, सुशांत भास्कर केदार | १९४ | भोगवटदार वर्ग १ | ८.१० | ०.५५ |
| ५ | किरण बळीराम खोचरे, भगाबाई बळीराम खोचरे, आकाश नागनाथ खोचरे, सुभाष हंबीरराव खोचरे | १९५ | भोगवटदार वर्ग १ | ७.०८ | ०.११ |
| ६ | अरूण विश्वनाथ डोके, अशोक विश्वनाथ डोके | १९६ | भोगवटदार वर्ग १ | ३.८७ | ०.२७ |
| ७ | उत्तरेश्वर तुकाराम केदार, नागनाथ नामदेव केदार, सुभाष नामदेव केदार, विशाखा नंदकुमार ननावरे, मनिषा चंद्रकांत खोचरे, सुजाता औदूंबर शिंदे | १९७ | भोगवटदार वर्ग १ | ३.७२ | ०.२६ |
| ८ | सुनिता तानाजी लोखंडे, प्रशांत भास्कर केदार, छाया देविदास साखरे, मंदा सुभाष केदार, गणेश भिमराव सातव चे अ पा क म्हणून वडील भिमराव नारायण सातव, पाटलु तात्या डोके, नागनाथ विश्वंभर साखरे, देविदास विश्वंभर साखरे | १९९ | भोगवटदार वर्ग १ | १२.८५ | ०.३९ |
| ९ | अभिमान जयसिंग खोचरे, संजय सुब्राव निंबाळकर, शालन सूब्राव निंबाळकर, संतोष चंद्रकात खोचरे, कांतीलाल जयसिंग खोचरे, चंद्रकांत जयसिंग खोचरे, तात्या शिवदास मोरे, दामोदर शंकर ननवरे, अजिनाथ मारूती डोके, नवनाथ मारूती डोके, हेमलता किसन खोचरे, दत्तात्रय तात्या मोरे, कान्होपात्रा सखाराम खोचरे | २११ | भोगवटदार वर्ग १ | १२.९५ | ०.३८ |
| १० | किसन हंबीरराव खोचरे, हेमलता किसन खोचरे | २१३ | भोगवटदार वर्ग १ | ५.१६ | ०.२३ |
| | **एकूण** | | | | **३.२८** |

दिनांक : २०/०९/२०२३
स्थळ : कुर्डूवाडी

सही/-
(प्रियंका आंबेकर)
उपविभागीय अधिकारी
माढा विभाग कुर्डूवाडी

जिमाका/सो/जाहि/१४९/२०२३-२४

## संक्षिप्त वृत्त...



### फुले विद्यालयात चित्रकला परीक्षा केंद्राचे उद्घाटन

**टेंभुर्णी :** टेंभुर्णी येथील महात्मा फुले विद्यालयात चालू वर्षीपासून एलिमेंटरी व इंटरमीजिएट ग्रेड या चित्रकला परीक्षेचे केंद्र नव्याने मंजूर झालेले आहे. कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून परीक्षा केंद्राला मंजुरी मिळालेली आहे. आज त्याचे उद्घाटन चित्रकलेचे सेवानिवृत्त कलाशिक्षक आर्टमास्टर कुंडलीक माळी यांच्या हस्ते झाले. परीक्षा केंद्रामध्ये एलिमेंटरी चित्रकला परीक्षेसाठी २०२ विद्यार्थी व इंटरमीजिएट ग्रेड चित्रकला परीक्षेसाठी ६४ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. यावेळी सर्व उपस्थित परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. नारायण भानवसे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नारायण भानवसे, मुख्याध्यापक विजय यादव उपस्थित होते. माऊली पवार आणि विद्यालयातील कलाशिक्षक संतोष माळी, रेश्मा मोरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी नागनाथ सुक्रे, शुभम हवलदार, सचिन खडके, सोहम व्यवहारे, रमेश नाळे, गिरीश देशपांडे, मच्छिन्द्र भुसारे, सचिन जाधव, शिवकन्या कानडे, प्रियंका हावळे, प्राजक्ता नागटिळक, अश्विनी कांबळे, वदंना क्षीरसागर, सायली गिरमे, अंकिता बोराटे, सुजित साळुंखे, अनिल राऊत आदी उपस्थित होते.



### रूद्रार यांच्या पुण्यतिथीनिमित्त नेत्र शिबिर

**सोलापूर :** महाराष्ट्र नाभिक महामंडळ युवक शाखेच्यावतीने आणि जिल्हा अंधत्व निवारण समिती, एम. जी तोष्णीवाल नेत्रपेढी, सिद्राम खार परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कै. सुशिलाबाई रूद्रार यांच्या पुण्यतिथी निमित्त याचे आयोजन केले होते. १५ ते २० रुणांची मोफत शस्त्र क्रियेसाठी निवड करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन सर्व नाभिक कुलदैवत व के. सुशिला रूद्रार यांच्या प्रतिमेला पुजन नामवंत नेत्र डॉ. नवनीत तोष्णीवाल यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षयांनी सिद्राम खार हे होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हिंदुराव गोरे, सिद्राम रूद्रार, डॉ. माधुरी पारपल्लीवार, चंद्रमो तमणुर, प्रकाश जोगीपेटकर, मोहन जमदाडे, अलका ताटे, शोभा राऊत, आनंद सिंगराल, अभयकुमार कांती हे होते. कार्यक्रमासाठी ह.भ.प.पुष्पा पाटील, राजु शुक्लवार, मनिष गंजाळकर, गितेंद्र बेनाळकर, राजू जंगाल, विजय शुक्लवार, राऊत, महेश श्रीमंगले, चंद्रकांत भागानगरे, मुरली पंदिला उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश जोगीपेटकर, आभार डॉ. माधुरी पारपल्लीवार यांनी मानले.




### आरोग्य शिबिराचा २५० जणांना लाभ

**सोलापूर :** भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चा सोलापूर शहर व मार्कंडेय सोलापूर रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्रमांक-२३ सलगरवस्ती मधील मोठा हनुमान मंदिर येथे आरोग्य शिबिर आयोजित केले होते. या आरोग्य शिबिराचा २५० जणांनी लाभ घेतला. यावेळी अध्यक्ष राम वाकसे, प्रशांत फत्तेपूर, कार्यलय प्रभारी अनिल कंदलगी, वैभव बिराजदार व डॉ. राजाराम पुल्ली, डॉ. भीमण्णा बदेली, रमेश वाकसे, बबलू खरात, लल्लू बुधकर, सोमनाथ माशाल, सिद्राम माशाळ, बबलू खताळ, राहूल जानकर, विठ्ठल खरात, श्रीकांत वाकसे, विनायक वाकसे, सलगरवस्तीतील नागरिक उपस्थित होते.



### ‘मेरी माटी मेरा देश’ अभियानाचे स्वागत

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत पिलीव, कुसमोड, झिंजेवस्ती या गावातील शेतातील माती कलशामध्ये जमा करण्यात आली. देशभरातून असे ७५०० कलश दिल्ली या ठिकाणी जमा करुन राजघाटावरती शहीद स्मारकासमोर या गावोगावच्या मातीचा उपयोग करुन भव्य अमृतवाटीका उभी करण्यात येणार आहे. यावेळी के.के. पाटील, हनुमंतराव सुळ, सोपान नारनवर, बाळासाहेब वावरे, बाळासाहेब सरगर, संजय देशमुख,तालुका उपाध्यक्ष प्रवीण काळे, दादासाहेब खरात, ज्ञानेश्वर तरंगे,नुतन जिल्हा कार्यकारणी सदस्य राहुल मदने, तुषार लवटे, राहुल जावळे, आबा बनसोडे, संजय पाटील, लक्ष्मण पवार, शहाजी वाघ, सदाशिव मदने, अंकुश लेंगरे, स्वप्नील सावळजकर, ज्ञानेश्वर मदने, दादा कपने, अनिल लेंगरे, राहुल चोबे, लक्ष्मण वाघमारे, सतिश गोंजारी, सुर्यकांत वाघमोडे उपस्थित होते.

# पंढरपूर-वाराणसी नवीन रेल्वे सुरु करा; सोलापुरात सर्व रेल्वेंना थांबा द्या

## क्षेत्रीय रेल समितीच्या बैठकीत खा.महास्वामी यांची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

मध्य रेल्वे सोलापूर विभागातील रेल्वेंना थांबा देणे, त्याचप्रमाणे अमृत भारत योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड व मोहोळ रेल्वे स्थानकाचा समावेश करणे, सांगोला मंगळवेढा-सोलापूर नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करणे, दौंड ते कलबुर्गी लोकल शटल सेवा अथवा डेमू रेल्वे सुरू करणे, रेल्वेचा सोलापूर पर्यंत विस्तार करणे, पंढरपूर वाराणसी नवीन रेल्वेची सुरू करणे, यांसह विविध मागण्या खा.डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी मांडल्या.

मुंबईतील क्षेत्रीय रेल समितीच्या बैठकीत सोलापूर विभागातील रेल्वेच्या समस्या सोडविण्याबाबत सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक नरेश ललवाणी, क्षेत्रीय रेल्वे सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी खा. महास्वामी म्हणाले, अमृत भारत योजनेत सोलापूर, दुधनी, कुर्डुवाडी रेल्वे स्थानकांचा समावेश यापूर्वी केला आहे. परंतु अक्कलकोट रोड, मोहोळ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात यावा. या योजनेअंतर्गत दोन्ही रेल्वे स्टेशनचा समावेश करण्याची मागणी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव,राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली होती. त्यामुळे दोन्ही ठिकाणांच्या समावेशासाठी विभागातून प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली. दौंड-कलबुर्गी-दौंड लोकल सुरू करण्याची आवश्यकता आहे. दौंड- कलबुर्गी- दौंड डेमो रेल नसल्याने दौंड, पंढरपूर सोलापूर, कलबुर्गीला जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे. डेमो रेल्वे दौंड - कलबुर्गी - दौंड या दरम्यानचा प्रवास करताना प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्यामुळे ही रेल्वे सुरू करण्यासाठी ताडीने प्रस्ताव पाठवावा अशा सूचना केल्या आहेत.

त्याचप्रमाणे रे.नं. २२१५७-५८ चेन्नई मुंबई सुपरफास्ट मेल आणि रे.नं. १२११५-१६ सिध्देश्वर एक्सप्रेसला मोहोळ रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा, रे. नं. २२७३१/३२ मुंबई-हैदराबाद-मुंबई अक्कलकोट रोड रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा, रे.नं. १७०२९ विजयपूरहून हैदराबादसाठी १९.२० वाजता सुटणाऱ्या गाडीची वेळ बदलून ती विजापूरहून एक तास आधी सोडण्याची मागणी महास्वामी यांनी केली. रे.नं. ११३०५ सोलापूर-गदग एक्सप्रेस पुणे मार्गे ही गाडी सोलापूर स्थानकावर ७.४५ वाजता थांबते. ११.५० वाजता सोलापूरहून गदगसाठी प्रयाण. सकाळी ८.३० ते ९.३० दरम्यान (२ तास आधी) निघणे अपेक्षित आहे. रे.नं. १६५३५/३६ गोलगुंबज आणि रे.नं. १७३०७/०८ बसवा एक्सप्रेसला लच्यान स्टेशनवर थांबा मिळावा.



### सर्व मागण्यांची पुर्तता करण्याचे मध्य रेल्वे महाप्रबंधकांचे आश्वासन

सोलापूर - नागपूर एक्सप्रेस या गाडीला सोलापूरजवळ होटगी रेल्वे स्थानकावर थांबा आहे. त्याचा विस्तार सोलापूरपर्यंत करावा यामुळे सोलापूरपर्यंत येणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळेल. नवीन पंढरपूर-वाराणसी- पंढरपूर एक्सप्रेस गाडी आठवड्यातून दोन दिवस सुरू करण्याची मागणी केली. विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर आणि या भागाला वाराणसीशी जोडणारी ही रेल्वे सुरू व्हावी. दुधनी रेल्वे स्थानकावर ५७६५९ फलकनुमा पॅसेंजर, ५७६२८ कलबूर्गी - सोलापूर पॅसेंजर, २२१५५ कलबूर्गी - कोल्हापूर एक्सप्रेस, १७३२० हुबळी एकस्प्रेस या चार रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा. दुधनी रेल्वे स्थानक जवळ रेल्वे पूल आहे परंतु पुलाच्या दुसऱ्या बाजूला शाळा, रुग्णालय आदींमुळे प्रवासी व स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे पुलांच्या विस्तारी करणाची मागणी महास्वामी यांनी केली. यावेळी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक नरेश ललवाणी यांनी सर्व प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मकता दर्शविली.

## राज्यस्तरीय बालसाहित्य, गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

**सुराज्य/सोलापूर**

अ.भा. साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती सोलापूरच्या वतीने, राज्यस्तरीय बालसाहित्य सेवा पुरस्कार व गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा नुकताच फडकुले सभागृहात झाला. ज्येष्ठ साहित्यिका डॉ. श्रुती श्री. वडगबाळकर या अध्यक्ष म्हणून तर निवृत्त शिक्षण संचालक गंगाधर म्हमाणे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

अरुण धुमाळ, रामचंद्र धर्मसाले व सुनील पुजारी यांच्या प्रार्थना सभेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कथामाला अध्यक्ष अशोक खानापुरे यांनी सर्वांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. उपाध्यक्षा आरती काळे यांनी, पाहुण्यांचा परिचय करून दिला तर राजेंद्र भोसले यांनी, बाल साहित्य सेवा पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय करुन दिला. त्यांच्या मानपत्रांचे वाचन उज्वला साळुंके आणि श्रीमंत बनसोडे यांनी केले. त्यानंतर संजय गोराडे यांच्या कोवळे कोंब’ या बाल साहित्यास, ’निर्मला मठपती स्मृती बालसाहित्य सेवा पुरस्काराने तर समाधान शिकेतोड यांच्या ’जादुई जंगल’ या बालसाहित्यास, ’प्रकाशभाई मोहाडीकर स्मृती बाल साहित्य



सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैशाली कटारे, शिवराज ढाले, अनिता लांडगे, एस. एच. दाते, एल. एच. बिराजदार, सातलिंग निंगफोडे, मच्छिंद इंगोले, मच्छिंद्र नागरे, योगेश गुजरे, यांना गंगाधर म्हमाणे यांच्या हस्ते गुणवंत शिक्ष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिक्षक - विद्यार्थी यांचे नाते भावनिक असते. ते आपण जपावे. अपेक्षा न काम करत राहावे असा सल्ला गंगाधर म्हमाणे यांनी आपल्या भाषणातून दिला, वडगबाळकर म्हणाल्या की, दर्जेदार पुस्तके वाढत आहेत. प्रेम, ज्ञान, शक्ती यापैकी आपल्याकडे ज्ञान व शक्ती आहे; पण प्रेम मात्र कमी होत चालले आहे. जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची प्रार्थना सर्वांनी लक्षात ठेवावी.

सूत्रसंचालन रामचंद्र धर्मसाले, सुनील पुजारी यांनी आभार मानले.

## ग्रीन स्टारने पटकावला पुंजाल बास्केटबॉल चषक

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर स्पोर्टस क्लबने आयोजित पुंजाल चषक १६ वर्षाखालील मुलांच्या गटात ग्रीन स्टार स्पोर्टस क्लबने अंतिम स्पर्धेत सेलिब्रेशन अ संघाला पराभूत करुन पुंजाल चषक पटकाविला. साखळी स्पर्धेत सेलिब्रेशन ब व सहारा व संघाचा ब संघाचा पराभव करीत उपांत्य फेरित प्रवेश केला. उपांत्य फेरित सहारा अ संघाचा पराभव करुन अंतिम फेरी गाठली. अंतिम सामना सेलिब्रेशन व ग्रीन स्टार यांच्यात झाला. या सामन्यात ग्रीन स्टारने ६५-५५ गुण फरकाने सामना जिंकला. खेळाडू पुढीलप्रमाणे : अतिक शेख (कप्तान), सुर्वेज तांबोळी, अली शेख, अश्रथ थोरात, अबुबकर कुरेशी यांचा समावेश होता. संघाला प्रशिक्षक तल्हा शेख, माजिद शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

## पंढरपूर-मंगळवेढा विकासकामांसाठी ५ कोटी निधी मंजूर : आ. आवताडे

**सुराज्य/मंगळवेढा**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये २५१५ - १२३८ या योजनेअंतर्गत ग्रामविकास व पंचायत राज विकास विभागाकडे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी निधीची मागणी केली असता मतदारसंघातील ७६ कामांसाठी शासन अध्यादेशाद्वारे ५ कोटी निधीला मंजूरी मिळाल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.



आमदार आवताडे यांनी सांगितले आहे की, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागातील विविध विकास कामांसाठी आपण २५१५ - १२३८ योजनेअंतर्गत निधीची मागणी केली होती. सदर मागणीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, महसूलमंत्री तथा सोलापूर जिल्हा तत्कालीन पालकमंत्रीराधाकृष्ण विखे-पाटील ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन व संबंधित खात्याचे अधिकारी यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाला आहे. मंजूर झालेल्या या निधीतून मतदारसंघाच्या विविध गावांमध्ये सभामंडप बांधणे, तालीम बांधणे, रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण, ग्रामपंचायत कार्यालय, स्मशानभूमी बांधणे, रस्ता खडीकरण व मुरमीकरण करणे, सामाजिक सभागृह, भूमिगत गटार बांधणे, पेव्हिंग ब्लॉक बसवणे इत्यादी विकास कामे मार्गी लागणार आहेत.

सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जाणार असून नियोजित कामांचा आराखडा तयार करून लवकरच कार्यारंभ आदेश देण्यात यावे, अशा सूचना आवताडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. तसेच आपल्या गावातील मंजूर कामे सुरळीत व वेळेवर मार्गी लावण्यासाठी स्थानिक पातळीवरील राजकारण आड न आणता संबंधित ग्रामपंचायतींनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आमदार जनसंपर्क कार्यालय पंढरपूर,मंगळवेढा येथे सादर करावीत, असे आवाहन जनसंपर्क कार्यालय यांच्याकडून करण्यात आले आहे.



## विद्यापीठाच्या एनएसएस संचालकांस लोकसेवा वसुंधरा गौरव पुरस्कार

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांना लोकसेवा वसुंधरा गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. पुण्यातील लोकसेवा प्रतिष्ठान, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, हरित मित्र परिवार आणि दूरदर्शन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पुण्यातील एका समारंभात हा पुरस्कार डॉ. राजेंद्र वडजे यांनी स्वीकारला. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी याबद्दल अभिनंदन करीत डॉ. वडजे यांचा सन्मान केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे, कुलसचिव योगिनी घारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कर्मचारी ज्ञानेश्वर भोई आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रभारी कुलगुरू डॉ.कामत म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण झाले आहे. त्यामुळे आज विद्यापीठ कॅम्पस हिरवाईने नटलेला दिसून येतो. सुंदर वातावरण येथे आहे. वृक्ष संवर्धन झाल्यामुळेच डॉ. वडजे यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### जरांगे पाटलांनी भुजबळांना फटकारले

## मी शांत आहे, मला डिवचू नका

**सुराज्य/सोलापूर**

एकीकडे सरकारमध्ये राहायचे आणि दुसरीकडे कायदा सुव्यवस्था बिघडेल असे कृत्य कार्यकर्त्यांच्या माध्यमातून करायाला लावायचे , छगन भुजबळांनी हा नवीन धंदा सुरू केला आहे. भुजबळांनी मराठा आरक्षणाला विरोध नाही. असे बोलले तेव्हापासून मी त्यांचे नाव सुद्धा घेतले नाही. त्यांनी मात्र आता गोड बोलून आता डाव टाकायचे ठरवले आहे. मी गप्प बसलो आहे. मला डिवचू नका, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनात महत्वाची भूमिका बजावत असलेले मनोज जरांगे- पाटील यांनी भुजबळ यांना यांना दिला.

छगन भुजबळ यांच्या समता परिषदेच्या माध्यमातून पोलीसात तक्रार दिली आहे. मनोज जरांगे पाटील ओबीसीमधून आरक्षण मागत आहेत. जाहीर सभांमधून मागणी करत आहेत. त्यामुळे दोन समाजामध्ये तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे संभाजी नगर येथील मनोज जरंगे पाटील यांच्या जाहीर सभेला बंदी घालावी याला जरांगे पाटील यांनी सोलापुरात गुरूवारी बोलताना सडेतोड उत्तर देत भुजबळांना चांगलेच फटाकाले.

आम्हाला शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने किमान सभा तरी घेऊ द्या. सरकार तुमचे आहे म्हणून आमच्या सभावर दबाव आणत आंदोलन हाणून पाडत आहात का? सरकारने माझे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. अनेक मंत्र्यांना पाठवत माझ्यावर दबाव आणला मात्र बळी पडलो नाही माझे आंदोलन चालूच ठेवले. त्यावेळी छगन भुजबळ यांनी माझा मराठा आरक्षणाला विरोध नाही. असे जाहीर केले. त्यामुळे तेंव्हापासून मी त्यांचे नाव सुद्धा घेतले नाही. आता मात्र भुजबळांनी



गोड बोलून असा डाव टाकायचे ठरवले का? एकीकडे सरकारमध्ये राहायचे आणि दुसरीकडे कायदा सुव्यवस्था बिघडेल असे कार्यकर्त्याला सांगायचे हा नवा धंदा भुजबळांनी चालू केला आहे का ? अशा शब्दात जरांगे पाटील यांनी भुजबळांचा समाचार घेतला

गट -बिट तुम्हाला कळतात. गट कसे पाडायचे कुटुंब कसे फोडायचे हा तुमचा उद्योग आहे. हे आम्हाला शिकवू नका. इथे केवळ सामान्य मराठ्यांचा गट आहे. लोकांना मुद्दाम चवताळायला लावू नका. कार्यकर्ते अंगावर घालून कायदा सुव्यवस्था बिघडण्याचे काम करू नका आहे. मी गप्प बसलो आहे. मला डिवचू नका, असे त्यांनी भुजबळांना ठणकावले.




### लायन्स क्लबतर्फे रक्त तपासणी शिबिर

**अक्कलकोट :** समाज रक्षणासाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांच्या आरोग्याची जपणूक व्हावी म्हणून लायन्स क्लबच्यावतीने रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ही बाब पोलीस आणि समाज यांच्यातील मैत्री वृद्धिंगत करणारी आहे, असे प्रतिपादन उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांनी केले. लायन्स क्लबच्यावतीने गांधी सप्ताहानिमित्त पोलिसांच्या रक्त तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

प्रास्ताविक अध्यक्ष सिद्धय्या मठ यांनी केले. पोलिसांनी ताणतणावात काम करताना आरोग्य कसे सांभाळावे याविषयी आरोग्य विस्तार अधिकारी महेश भोरे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात उत्तर पोलीस, दक्षिण पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांची मोफत रक्त तपासणी करण्यात आली. यावेळी दक्षिण पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोलीस उपविभागीय कार्यालयातील पोलीस निरीक्षक श्रीमती चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक भगवान नाईकवाडे, सहायक पोलिस निरीक्षक चव्हाण, गोपनीय विभागाचे धायगोडे, शरद चव्हाण,ठाणे अंमलदार राठोड,बिपिन सुरवसे,लायन्स क्लब सचिव गौरीशंकर चनशेट्टी खजिनदार डॉ.सुनील बिराजदार. सुधीर माळशेट्टी, शिवपुत्र हळगोदे, शिवानंद नंदर्गी, शिवशरण खुबा, मल्लिनाथ साखरे, शिरिष पंडित, प्रभाकर मजगे, राजेंद्र कापसे उपस्थित होते. रक्त तपासणी इमाम मियाडे, अंताक्षरी खुने,रोहित कोरे यांनी केले. सूत्रसंचालन बाबासाहेब निंबाळकर यांनी केले. गौरीशंकर चनशेट्टी यांनी आभार मानले.

# अर्धनारी नटेश्वराच्या पावन भूमीतील माती जाणार दिल्लीला

**सुराज्य/वेळापूर**

माळशिरस तालुक्यात आज भाजप कडून मेरी माटी मेरा देश अभियान राबविण्यात येत आहे. तालुक्यातील निमगाव, पिलीव, मळोली, वेळापूर, खुडूस, माळशिरस, फोंडशीरस, दहिगाव, नातेपुते आदी गावांत जाऊन त्याठिकाणील माती या अभियानांतर्गत एकत्र करण्यात आली. ही माती दिल्ली येथील अमृतवाटिका मध्ये वापरण्यात येणार असून लवकरच माती दिल्लीला पाठविण्यात येणार आहे.

तालुक्यातील निमगाव येथून या अभियानाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर श्री अर्धनारी नटेश्वराच्या पावन भूमीत पालखी चौक वेळापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करून या ठिकाणी माती एकत्रित करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संकल्पनेतून एक नाविन्यपूर्ण उपक्रम साकारला जात आहे. मेरी माटी, मेरा देश आभियाना अंतर्गत देश भरातून असे ७५०० कलश दिल्ली या ठिकाणी जमा करून शहिद स्मारकासमोर या गावोगावच्या मातीचा उपयोग करून वाटिका उभी करण्यात येणार आहे.

मेरी माटी मेरा देश अभियाना साठी वेळापूर, तोंडले बोडले, दसुर, खळवे, उघडेवाडी, धानोरे, पिसेवाडी, म्हेत्रेमळा, शेरी, खंडाळी परिसरातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील




ओंजळभर माती पालखी चौक वेळापूर येथे एकत्रित केली.

यावेळी के.के. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष हनुमंतराव सूळ, सोपान नारनवर, बाळासाहेब वावरे, बाळासाहेब सरगर, संजय देशमुख, तालुका उपाध्यक्ष प्रवीण काळे, दादासाहेब खरात, ज्ञानेश्वर तरंगे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### जवाहर कॉलेजमध्ये प्रयोगशाळा संशोधन केंद्राचे उद्‌घाटन

**अणदूर** : जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर येथे रसायनशास्त्र विभागाच्या विस्तारित प्रयोगशाळा व संशोधन केंद्राचे उद्‌घाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रमोद येवले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व्यंकटराव पाटील हे होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव, डॉ.भगवान साखळे, अ‍ॅड. लक्ष्मीकांत पाटील, मारुती खोबरे, डॉ.अंकूश कदम, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे, प्राचार्य सुरेश ठोंबरे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.मल्लिनाथ बिराजदार, आभार डॉ.मल्लिनाथ लंगडे यांनी मानले.

### मंगळवेढ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयाचे आज उद्‌घाटन

**मंगळवेढा** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे दि. ६ ऑक्टोबर रोजी पंढरपूर मंगळवेढा दौऱ्यावर येणार आहेत. मंगळवेढा शहरांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन सकाळी ११ वा. जयंत पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

तसेच मंगळवेढा तालुक्यातील टेंभू-म्हैसाळ योजनेतील उर्वरीत गावांच्या पाणी वितरण प्रश्नाबाबत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुन्नूर (मंगळवेढा) येथे शेतकरी संवाद, पाणी वितरणबाबत सविस्तर चर्चा सत्र होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनी दिली. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे, शेखर माने, राहुल शहा, विजयकुमार खवतोडे, अ‍ॅड.दत्तात्रय पाटील, मुजम्मील काझी, तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, संगीता कट्टे-पाटील, माणिक गुंगे यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी बांधव बहुसंख्येने उपस्थित राहणार आहेत.

### राजशेखर कापसे यांचा अमेरिकेतून सन्मानपत्राद्वारे गौरव



**अक्कलकोट** : लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३४ डी १ चे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर व महाराष्ट्र राज्य (मुंबई वगळून) मल्टिपल कॉन्सिलचे विद्यमान उपाध्यक्ष लायन राजशेखर कापसे यांनी २०२२-२३ साली प्रांतपाल म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यापार्श्वभूमीवर इंटरनॅशनल अध्यक्ष लायन ब्रियान शीहान यांनी अमेरिकेतून सन्मान पत्र पाठवून त्यांचा गौरव केला आहे. राजशेखर कापसे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर,सातारा,सांगली,कोल्हापूर,रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पुणे जिल्ह्यातील इंदापूर,बारामती हे जिल्हे कार्यरत होते. कापसे यांनी दिलेल्या अ‍ॅक्शन प्लॅननुसार सर्व जिल्ह्यांमध्ये उत्तम सेवाकार्य झाले आहे.

याबद्दल त्यांचे भोजराज नाईक-निंबाळकर, एम.के. पाटील, डॉ. विरेंद्र चिखले, अशोक मेहता, बाबासाहेब पवार, जगदीश पुरोहीत, अण्णासाहेब गळतगे, सुभाष अरवाडे, डॉ. गुलाबचंद शहा, डॉ. व्यंकटेश यजुर्वेदी, जितेंद्र दोशी, राजेंद्र शहा कासवा, शिवशरण खुबा, सिद्धय्या मठ, गौरीशंकर चनशेट्टी, डॉ. सुनील बिरादार, राजेंद्र हत्ते, महेश हिंडोळे, मल्लिकार्जुन मसुती, मल्लिनाथ साखरे, प्रभाकर मजगे, सुभाष गडसिंग, डॉ. प्रदीप घिवारे, राजशेखर हिप्परगी, अभय खोबरे, शिवानंद नंदर्गी, चेतन जाधव यांनी अभिनंदन केले आहेत.

### आजपासून ब्राह्मण बिझनेस नेटवर्क शाखेचे बीबीएन कला उत्सव प्रदर्शन

**सोलापूर** : ब्राह्मण बिझनेस नेटवर्क सोलापूर शाखेच्यावतीने दि. ६ ते ८ ऑक्टोबर २०२३ दरम्यान बीबीएन कला उत्सव-२०२३ प्रदर्शन आणिए प्रदर्शनातील साहित्यांच्या विक्रीचे आयोजन डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात केल्याची माहिती आश्लेषा निपुणगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सदरचे प्रदर्शन खुले राहणार आहे. कला उत्सवाचे यंदाचे हे सहावे वर्षे आहे. खास महिलांनी महिलांसाठी आयोजित या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सहभागी महिला उद्योजकांना अतिशय वाजवी दरात स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या प्रदर्शनात आपटे दूध, पीएनजीएस, गार्गी फॅशन ज्वेलरी, इलेक्ट्रॉनिक्स होम-अप्लायन्सेस, इमिटेशन ज्वेलरी, कुंदन ज्वेलरी, वैविध्यपूर्ण साड्या, गिफ्ट आयटम्स, ड्रेस, गरबा ड्रेस, डिझायनर ब्लाऊज, लहान मुलांचे ड्रेस, पैठणी पर्स, वॉलपेपर, विविध प्रकारचे मसाले, पंढरपूरची उदबत्ती, डायपर, गोधन उत्पादने, फराळाचे विविध पदार्थ, मोसंबी क्लिनर, खाद्यपदार्थ आदी स्टॉलचा समावेश आहे.

प्रदर्शनात आकर्षक ऑफर्स, दररोज लकी ड्रॉ, कुपन त्यामधून पाच जणांना आकर्षक भेटवस्तूदेखील देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस मानसी कुलकर्णी, मनिषा औरंगाबादकर, भारती देशक, संजय औरंगाबादकर उपस्थित होते.

### भगिनी समाज संस्थेतर्फे २० ऑक्टोबरला शारदोत्सव

**अक्कलकोट** : भगिनी समाज संस्थेच्यावतीने नवरात्रीच्या काळात दुर्गेचे नवनवीन रूप अनुभवता यावीत. त्यातून मनोरंजन व्हावे, यासाठी शारदोत्सव कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिरात शुक्रवार, दि. २० ऑक्टोबर रोजी दु.१२ वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती अध्यक्ष विजया म्हमाणे, सुलभा राहणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यात समूह, लोक, युगल, आशा भोसले, मोहम्मद रफी, किशोर कुमार यांच्या गाण्यावर आधारित तर एकलनृत्य आशा भोसले यांच्या गाण्यावर आधारित असणे आवश्यक आहे. तरी स्पर्धेसाठी इच्छुकांनी सुलभा राहणे (९८२००२६१३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. या पत्रकार परिषदेस आरती फुसगल, राखी हैनाळ, रश्मी माशाळकर, स्वाती साळुंखे, रेखा बळग, वंदना शिंगडगावकर, अर्चना बीडकर आदी उपस्थित होते.

# आढेगाव येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा मेळावा

## कारखानदार विकासपुरुष नव्हे दरोडेखोर-राजू शेट्टी

**सुराज्य/टेंभुर्णी**

**आढेगाव ता माढा येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळाव्याचे आयोजन जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील यांनी केले होते.**




यावेळी राजू शेट्टी म्हणाले सोलापूर जिल्ह्यात देशातील सर्वाधिक ४६ साखर कारखाने असून, ऊस गाळप आणि साखर निर्मितीतही देशात अव्वल आहेत. साखर कारखानदार विकासपुरुष नव्हे तर नामवंत दरोडेखोर आहेत. शेतकऱ्यांनो दोष जमिनींचा नाही तर ज्यांच्या ताब्यात ऊस दिला तो दरोडेखोर निघालेला आहे, अशी घणाघाती टीका माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या छत्रपती शिवाजी महाराज जनजागृती अभियानांतर्गत मंगळवारी (ता. ३) रोजी आढेगाव (ता. माढा) येथे शेतकरी मेळाव्यात शेट्टी बोलत होते. व्यासपीठावर इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे, स्वाभिमानी पक्ष प्रदेशाध्यक्ष जालिंदर पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष अमरसिंह कदम, शिवाजी पाटील, तानाजी बागल आदी उपस्थित होते.

राजू शेट्टी म्हणाले, ऊसापासून २२ पदार्थ तयार केले जातात. त्यापैकी इथेनॉलला सर्वाधिक दर असूनही उपपदार्थांच्या उत्पन्नाचा वाटा शेतकऱ्यांना दिला जात नाही. मात्र साखर कारखानदारांनी एकत्र ऊसदराच्या आडून शेतकऱ्यांची आर्थिक गळचेपी केली आहे.

उसाची काटेमारी करून एका सहकारी साखर कारखान्यापासून ४ ते ५ खासगी साखर कारखाने उभे करतात. साखरसम्राट हे शेतकऱ्यांच्या ऊसापासून नव्हे तर रक्तापासून साखर बनवतात अशी टीकाही खासदार शेट्टी यांनी केली. यावेळी कोंडारभागातून मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग उपस्थित होते

यावेळी स्वाभिमानी पक्ष जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, संघटना जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, जिल्हाध्यक्ष युवा आघाडी विजय रणदिवे, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, माढा तालुकाध्यक्ष प्रताप पिसाळ, रामभाऊ टकले, दादासाहेब कळसाईत, धनंजय पाटील,निलेश मेटे नानासाहेब मेटे राजेंद्र बनसोडे, सुरेश गोरे,महेश स्वामी मनोज बाबर बाबासाहेब गायकवाड तानाजी गायकवाड संतोष नाईकनवरे आदींसह शेतकरी ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोलापूर जिल्ह्यात रिकव्हरीची चोरी


रिकव्हरी संदर्भात राजू शेट्टी म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात २ ते ३ टक्के रिकव्हरी चोरली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा तोटा सर्वाधिक झाला आहे. १ टक्के रिकव्हरी चोरल्याने ३८५ रुपये प्रतिटन दर कमी मिळतो. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोल्हापूरपेक्षा ७०० रुपये कमी दर मिळतो त्यामुळे १७५० कोटी रुपयांचे नुकसान ऊसदर कमी दिल्याने झाला आहे.

## महापालिकेला पुरस्कार मिळाल्याबद्दल आयुक्तांचा सत्कार

**सुराज्य/सोलापूर**

स्मार्ट सिटी मिशन अभियान अंतर्गत देशाच्या पश्चिम विभागातील सोलापूरचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल महानगरपालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना पारितोषिक प्रदान केल्याबद्दल अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटना च्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटना शहर अध्यक्ष बाली मंडेपू, उपाध्यक्ष दशरथ अडाकूल, हसन शेख निलेश वायमारे,बुद्धराष्ट्र सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अजित गादेकर, अर्जुन तळभंडारे, देविदास मुनगल, सिकंदर शेख इत्यादी उपस्थित होते.



### एनटीपीसीतर्फे पोषण आहार कीटचे वाटप

**सोलापूर** : राष्ट्रीय पोषण महिना-२०२३ निमित्त एनटीपीसी सोलापूरच्यावतीने प्रकल्पग्रस्त जिल्हा परिषद शाळेतील मुलांना नुकतेच पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. एनटीपीसीने आहेरवाडी, फताटेवाडी, होटगी स्टेशन, तिल्हेहाळ या प्रकल्पग्रस्त गावांमधील जिल्हा परिषद शाळेळतील विद्यार्थ्यांना पोषण कीटचे वाटप केले. प्रत्येक गावातील सरपंचांच्या उपस्थितीत हा वितरण कार्यक्रम पार पडला.

## लिंगायत समाजाच्या विविध मागण्यांसाठी वाले यांनी काढली अनवाणी पदयात्रा

**सुराज्य/सोलापूर**



लिंगायत महासंघाचे लिंगायत समाजाच्या विविध मागण्या संदर्भात शासनाचे लक्ष वेधण्याकरिता व मागण्या मान्य करण्यासाठी सुरेश वाले यांनी मौजे वटवटे ते श्री सिद्धेश्वर मंदिर व कोंतम चौकातील बसवेश्वर सर्कल येथील जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यापर्यंत ४० किलोमीटरचा विना अनवाणी पायी पदयात्रा काढली. त्यानंतर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनात लिंगायत धर्मीयांच्या विविध मागण्या - १) जगतज्योती महात्मा बसवेश्वर स्मारक मंगळवेढा येथे लवकरात लवकर निर्णय घेऊन उभारणी करावे. २) लिंगायत समाजाला सरसकट आरक्षण मिळणेबाबत.

३) लिंगायत समाजातील मुला-मुलींसाठी वसतीगृह लवकरात लवकर निर्णय घेऊन वसतीगृह उभारण्यात यावे.

४) वडापूर बॅरेजसाठी निधी उपलब्ध लवकरात लवकर मंजूर व्हावे अशाप्रकारे वरील विविध मागण्या लिंगायत महासंघातर्फे देण्यात आला. प्रांताध्यक्ष सुदर्शन बिरादार,लिंगायत समाजाचे वरिष्ठ नेते विजयकुमार हत्तुरे,गणेश चिंचोली, सचिन शिवशक्ती आनंद मुस्तारे,बसवराज बगले, प्रवीण वाले, वैभव विभुते,राजकुमार सारणे, मल्लिनाथ कलशेट्टी, शरद गुमटे,मल्लिनाथ सोलापूरे, बनसिद्ध म्हमाणे,संतोष राजमाने कल्याणराव चौधरी,सचिन तुगावे आदी उपस्थित होते.

> देवेंद्र फडवणीस मुख्यमंत्री असताना अक्कलकोट रोडवरील होटगी मठात झालेल्या जाहीर सभेत लिंगायत धर्मगुरू समोर आरक्षण देणार असल्याचे आश्वासन दिले होते. आजतागायत त्या आश्वासनाची पूर्तता झाली नाही.खोटे आश्वासन देऊन लिंगायत समाजाची सहनशीलतेचा अंत पाहू नये. शासनाने लवकर शुद्धिपत्रक काढावे. विजयकुमार हत्तुरे लिंगायत समाजाचे वरिष्ठ नेते

## घोडके यांच्या 'अशीही दुनियादारी' पुस्तकाला अनुदान जाहीर

**सुराज्य/सोलापूर**



औरादचे (ता.द.सोलापूर) सुपूत्र अक्कलकोट तालुक्यातील कल्लहिप्परगे शाळेतील विद्यार्थीप्रिय शिक्षक, संवेदनशील कवी, चालू घडामोडीवरील उत्कृष्ट भाष्यकार, काव्यप्रेमी शिक्षक मंचचे संस्थापक व राज्यअध्यक्ष , 'साहित्यीक सोलापूरी' सदर चालविणारे जाणकार लेखक आनंद घोडके यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेल्या अशीही दुनियादारी या ललित गद्य पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या कला साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने अनुदान जाहीर झाले आहे.

आनंद घोडके यांचे विविध वर्तमानपत्रातून आजपर्यंत २०० हून अधिक कविता, ५०० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले असून काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या माध्यमातून त्यांनी एक सक्रिय साहित्य मंच निर्माण करून राज्य व जिल्हा स्तरावर ५० हून अधिक साहित्यिक कार्यक्रम घेतले आहेत. अशी ही दुनियादारी '' या त्याच्या ललित गद्य पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या कला साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान जाहीर झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## पांढऱ्या पायाची म्हणत विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

तू पांढऱ्या पायाची आहे,लग्न होऊन एक वर्ष झाले तरी तुला मूलबाळ होत नाहीत.सहा महिन्यात तुला दिवस नाही गेले तर माझ्या मुलाचे दुसरे लग्न लावून देते.तू माझ्या मुलाला सोडचिठ्ठी देऊन घरी निघून जा.तुझ्या दवाखान्याचा खर्च खूप होत आहे. आम्हाला परवडत नाही.असे म्हणत माहेरून एक लाख रुपये घेऊन ये नाहीतर तुला नांदवून घेणार नाही असे म्हणत दमदाटी करून विवाहितेला चिठ्ठी लिहून आत्महत्या करण्याची धमकी दिल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती नितीन सलवदे,सासू संगीता सलवदे,सासरे विलास सलवदे,नणंद वर्षा खरात (सर्व. रा. मु.पो.अकोली,ता.मोहोळ,जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी श्वेता नितीन सलवदे (वय-२२,रा.भवानी पेठ, मड्डी वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना दि.२७ मे २०१९ ते २२ नोव्हेंबर २०२२ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.पुढील तपास पोलीस हवालदार दुधाळे हे करीत आहेत.

## व्यावसायिकाला दहा तास डांबून ठेवून मारहाण

**सुराज्य/सोलापूर**




व्यावसायिकाला दहा तास अपार्टमेंट मधील एका फ्लॅटमध्ये डांबून ठेवून मारहाण केल्याप्रकरणी एकाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.१ सप्टेंबर २०२१ ते आजतागायतपर्यंत गोली अपार्टमेंट ७० फूट रोड येथे घडली. याप्रकरणी अजिंक्य मनोज जोशी (वय-३२,रा.रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून श्रीनिवास संगा (रा.गोली अपार्टमेंट मागे,७० फूट रोड,सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, विजया डेव्हलपर्स आणि कन्स्ट्रक्शनचा फिर्यादी यांचा व्यवसाय असून लॉकडाऊनमध्ये व्यवसायात लॉस झाला. त्यावेळी फिर्यादी यांनी १ सप्टेंबर २०२१ रोजी श्रीनिवास याच्याकडून तीन टक्के व्याजदराने दहा लाख पन्नास हजार रुपये घेतले होते. त्यापोटी फिर्यादी त्यांना प्रथम महिन्यात तीन टक्के व्याजदराने पैसे देण्याकरिता गेले असता,श्रीनिवास याने फिर्यादीस मी तुला तीन टक्क्याने पैसे दिले नाही. तीस टक्क्याने पैसे दिले आहे.तर तू मला तीस हजार रुपये नाहीतर तीन लाख रुपये दे.नाहीतर मी तुला इथून सोडणार नाही. असे म्हणून फिर्यादीकडून आजतागायतपर्यंत ४७ लाख रुपये ऑनलाईन व उर्वरित रक्कम हे साथीदाराला फिर्यादी यांच्या ऑफिसमध्ये पाठवून घेत होते.दरम्यान दहा ते पंधरा वर्षांपूर्वी श्रीनिवास संगा याने त्याच्या ओळखीच्या लोकांना फिर्यादी हे बाळे येथील साइटवर असल्याने त्यांना तेथे जाऊन फिर्यादीस गोली अपार्टमेंट येथील मागे सत्तर फूट रोड येथे घेऊन आले. त्यावेळी श्रीनिवास याने फिर्यादी अजिंक्य जोशी यांना अजून ७० लाख रुपये दे नाहीतर येथून सोडणार नाही. असे म्हणून अपार्टमेंटमधील फ्लॅटमध्ये आठ ते दहा तास डांबून ठेवून मारहाण केली.

फिर्यादीने श्रीनिवास याला वेळोवेळी ऑनलाईन पद्धतीने साठ लाख रुपये देऊन देखील श्रीनिवास संगा हा ७० लाख रुपयांची वसुली करण्यासाठी फिर्यादीस त्रास दिला, असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनवणे हे करीत आहेत.

## शिक्षण मंडळ आवारातील 'त्या' पडक्या रूममधील जुने दस्तावेज जपण्याची गरज

**सुराज्य/सोलापूर**

### ढिगाऱ्याखाली महत्वाचे रेकॉर्ड मातीमोल होण्याची शक्यता !



नवी पेठेतील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आवारातील रूमची भिंत ढासळल्याने महापालिका अभिलेख विभागाचे जुने रेकॉर्ड खराब होत आहे. त्यातील महापालिकेचे जुने दस्ताऐवज जपण्याची आवश्यकता आहे.

मात्र याकडे महापालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. गत आठवड्यापासून या भिंतीचा थोडा थोडा भाग ढासळला चालला आहे. गंभीर बाब म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून या रूमच्या भिंतीमध्येच मोठ्या प्रमाणात झाड वाढले असून, भिंतीला तडे जात अखेर ती भिंत ढासळली. आठवड्यापासून सदरची वेळीच झाड तोडण्याची कार्यवाही झाली नसल्याने या रूमची भिंत पडली. अशा भयाण अवस्थेतही महापालिकेच्या महत्त्वपूर्ण अशा अभिलेख विभागातील जुने रेकॉर्ड रूममध्ये गेल्या काही वर्षांपासून ठेवण्यात आले. वास्तविक पाहता चांगल्या ठिकाणी हे जुने रेकॉर्ड ठेवण्याची गरज होती.

भिंत ढासळत असताना पडक्या रूममधील जुने रेकॉर्ड रुममध्ये पावसाचे पाणी शिरले असून, ती खराब रिकॉर्ड रुममधील दस्ताऐवज खराब होण्याची शक्यता आहे. सुरक्षितपणे काढण्याची कोणत्याही कार्यवाही केली गेली नाही.

याबाबतमहापालिकाप्रशासनाचे अक्षम्य उदासीनता दिसून येते. गेल्या आठवड्याभरापासून थोडी थोडी भिंत पडल्याने या रूममध्ये पावसाचे पाणी गेले आहे. यामुळे दस्तावेज भिजून खराब होण्याची शक्यता आहे. तेव्हा तत्काळ महापालिका प्रशासनाने हे जुने दस्तावेज सुरक्षितपणे काढून जतन करण्याची गरज वर्तवली जात आहे. अन्यथा ढिगाऱ्याखाली हे रेकॉर्ड मातीमोल होण्याची शक्यता आहे.

### उद्यान विभागाकडून वृक्ष तोडण्याची कार्यवाही

भिंत पडल्यानंतर अखेर जुन्या रेकॉर्ड रूम मधील भिंतीवर वाढलेला तो वृक्ष तोडण्याची कार्यवाही महापालिका उद्यान विभागाकडून अखेर आज दुपारी हाती घेण्यात आली. हा वृक्ष हटविल्यानंतर येथील अजोरा करण्यात येणार आहे.

## आकांक्षीत तालुका कार्यक्रमात अक्कलकोटचा समावेश

**सुराज्य/अक्कलकोट**



केंद्र शासनाच्या नीती आयोगाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत अक्कलकोट तालुक्याचा समावेश आहे. आकांक्षीत तालुक्यांनादेखील इतर विकसित तालुक्याच्या बरोबरीने आणणे यासाठी या कार्यक्रमाद्वारे प्राधान्य देण्यात येणार असल्याची माहिती गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संकल्प सप्ताहाचा शुभारंभ ऑनलाईन पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला झाला असून, यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी जिल्हा परिषद, सभागृहात उपस्थित होते. यादरम्यान संकल्प सप्ताह सुरू आहे. यात संबंधित सर्व विभागांच्या विविध उपक्रमांचा समावेश असणार आहे.

अक्कलकोट तालुक्यातील आरोग्य, महिला व बाल कल्याण, शिक्षण, कृषी आणि पशुसंवर्धन विभाग, पंचायत विभागाचे काम समाधानकारक असून पायाभूत सुविधा तसेच बचत गट संबंधाने आणि आरोग्य विभागाचे असंसर्गजन्य रोगाच्या बाबतीत काम मध्ये आणखी आपल्याला सुधारणा करणे आवश्यक आहे. असल्याचेही खुडे म्हणाले.

## संक्षिप्त वृत्त...

### सप्तपदीशिवाय हिंदू विवाह वैध ठरत नाही : कोर्ट

**अलाहाबाद :** हिंदू विवाह कायद्यांतर्गत होणाऱ्या विवाहांमध्ये सप्तपदी आणि इतर विधी महत्त्वाचे आहेत. या विधींशिवाय लग्न वैध ठरत नसल्याचं मत अलाहाबाद कोर्टाने नोंदवलं आहे. पत्नीने घटस्फोट न घेता दुसरं लग्न केल्याने तिला शिक्षा सुनावण्यासंदर्भात अर्ज दाखल करण्यात आला होता. परंतु, न्यायालयाने हे प्रकरणच निकाली काढले आहे. जोपर्यंत लग्न योग्य विधींनी पूर्ण होत नाही तोवर त्याला लग्नसोहळा म्हणता येणार नाही. पारंपरिक विधींशिवाय विवाह झाला असेल तर तो कायद्याच्या दृष्टीने विवाह ठरत नाही. हिंदू कायद्यांतर्गत सप्तपदी विधी विवाहासाठी आवश्यक विधी आहे, असं मत न्यायाधीश संजय कुमार सिंह यांनी नोंदवलं. हिंदू विवाह कायदा १९७७ च्या कलम ७ नुसार, हिंदू विवाह हा पारंपरिक संस्कार आणि समारंभातून केला जातो. या समारंभात सप्तपदी झाल्यानंतर विवाहसोहळा पूर्ण होतो, असंही न्यायालयाने नोंदवलं.




### सलामीवीर शिखर धवनचा घटस्फोट अखेर मंजूर!

**नवी दिल्ली :** भारताचा दिग्गज सलामीवीर व डावखुरा तडाखेबाज फलंदाज शिखर धवन गेल्या काही काळापासून क्रिकेटपासून दूर आहे. शिखर धवन जवळपास १० महिन्यांपूर्वी डिसेंबर २०२२ मध्ये त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. कोर्टात प्रलंबित असणारं त्याचं घटस्फोटाचं प्रकरण याचं एक कारण असल्याचं बोललं जात आहे. शिखर धवनला आता दिल्ली कोर्टानं मोठा दिलासा दिला असून त्याला पत्नी आएशा मुखर्जीपासून घटस्फोट मंजूर केला आहे. शिखर धवनला पत्नीकडून मानसिक त्रास दिला जात होता, हा धवनचा दावा न्यायालयानं मान्य केला आहे. बऱ्याच काळापासून शिखर धवनच्या घटस्फोटाचं प्रकरण न्यायालयाकडे प्रलंबित होतं. दिल्लीच्या पतियाला कुटुंब न्यायालयात शिखर धवननं घटस्फोटासाठी अर्ज केला होता. पत्नीकडून मानसिक त्रास होत असल्याची तक्रार शिखर धवननं आपल्या याचिकेत केली होती. पत्नी आएशा मुखर्जी आपल्याला मुलाला भेटू देत नसल्याचंही शिखर धवननं याचिकेक नमूद केलं होतं. या सर्व प्रकरणाची सविस्तर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयानं शिखर धवनला घटस्फोट मंजूर केला आहे.



### अमिताभ बच्चन यांना दंड करा : व्यापारी संघटनेची मागणी

**नवी दिल्ली :** महानायक अमिताभ बच्चन यांची एक जाहिरात वादात अडकली आहे. व्यापाऱ्यांची संघटना CAIT ने एका जाहिरातीविरोधात ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक पुरवठा मंत्रालयाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या मते ही जाहिरात दिशाभूल करणारी आहे. ही जाहिरात फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज सेलशी संबंधित असून त्यात अमिताभ बच्चन आहेत. अमिताभ यांच्या एका संवादावर सीएआयटीने नाराजी व्यक्त केली आहे. सीएआयटीने सेंट्रल कन्झ्युमर प्रोटेक्शन अथॉरिटीकडे (CCPA) तक्रार केली आहे. त्यात ही जाहिरात दिशाभूल करणारी आणि देशातील छोट्या विक्रेत्यांविरुद्ध, दुकानदारांविरूद्ध असल्याचं म्हटलं आहे. त्यांनी एका निवेदनाच्या माध्यमातून ही जाहिरात मागे घेण्याचीही मागणी केली आहे. खोट्या किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींसाठी ग्राहक संरक्षण कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार फ्लिपकार्टकडून दंड आकारण्यात यावा आणि बच्चन यांना १० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात यावा, अशी मागणी सीएआयटीने केली आहे.



### धनगर आरक्षणविरोध राष्ट्रपतींच्या दारी!

**नवी दिल्ली :** धनगरांना आदिवासी कोटय़ातून आरक्षण देण्यास राज्यातील आदिवासी आमदारांनी विरोध केला असून हा वाद आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यापर्यंत पोहोचला आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष व आदिवासी नेते नरहरी झिरवळ यांच्या नेतृत्वाखाली १२ आदिवासी आमदारांनी बुधवारी मुर्मू यांची भेट घेतली. यासंदर्भात तथ्यांचा अभ्यास करून केंद्र व राज्य सरकारला सूचना करण्याचे आश्वासन मुर्मू यांनी दिल्याची माहिती झिरवळ यांनी दिली. धनगरांना आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही. त्यांना भटक्या विमुक्त प्रवर्गामधून ३.५ टक्के आरक्षणाचा लाभ मिळतो.

या आरक्षणात वाढ केली तरी चालेल. धनगरांना आदिवासी कोटय़ातून नव्हे तर स्वतंत्र आरक्षण द्या. आदिवासींमध्ये धनगरांचा समावेश केला जाऊ नये, आमचे आरक्षण अबाधित राहिले पाहिजे, अशी मागणी मुर्मू यांच्याकडे केल्याचे झिरवळ यांनी सांगितले. राज्यामध्ये मराठा व ओबीसी आरक्षणाप्रमाणे धनगरांच्या आरक्षणाचा प्रश्नही तीव्र झाला आहे. धनगरांचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश करून त्यांना आदिवासी कोट्यातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी गेल्या महिन्यामध्ये यशवंत सेनेने २१ दिवस उपोषण केले होते. या उपोषणानंतर राज्य सरकारने धनगरांच्या आरक्षणासंदर्भात बैठकही घेतली होती व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते.



## ▶▶ शिंदे सरकारवर नामुष्की

# आघाडीच्या मंजूर कामांवरील स्थगिती उठवली

**सुराज्य/मुंबई**

**महाविकास आघाडी सरकारच्या काळात एक एप्रिल २०२१ नंतर मंजूर झालेल्या, मात्र निविदा काढणे बाकी असलेल्या; निविदा मागवल्या असल्या तरी कार्यादेश काढणे बाकी असलेल्या आणि कार्यादेश देऊनही कामे सुरू होणे बाकी असलेल्या विकासकामांना स्थगिती देण्याचा आदेश ज्या पद्धतीने काढण्यात आला आहे, तो घटनबाह्य आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविले. 'अशा कामांवरील स्थगिती सरसकटपणे उठविण्यात येत आहे', असे नवे परिपत्रक सरकारतर्फे राज्याच्या मुख्य सचिवांना काढण्याची नामुष्की ओढवली. या नव्या परिपत्रकाची आदेशात नोंद घेऊन न्यायालयाने या संबंधातील सर्व याचिका अखेरीस निकाली काढल्या.**



'ज्या प्रकल्प व विकासकामांना आधीच्या सरकारने छाननीअंती रीतसर मंजुरी दिली आणि नंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनात रीतसर निधीही मंजूर झाला; शिवाय राज्यपालांची मंजुरीही मिळाली, अशा कामांना नंतर सत्तेत आलेल्या मुख्यमंत्र्यांनी (एकनाथ शिंदे) निव्वळ तोंडी आदेश देऊन स्थगिती दिली. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाप्रमाणे मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी अशी सर्व कामे स्थगित करण्याचे निर्देश सर्व विभागांच्या सचिवांना १८ व २१ जुलै २०२२ रोजी दिले. हे घटनाबाह्य असल्याने उच्च न्यायालयाच्या काही खंडपीठांनी काही प्रकरणांत मुख्य सचिवांचे ते आदेश जसे रद्द केले; तसेच आमच्या याचिकांतील प्रकल्पांबाबतही आदेश द्यावेत,' अशा विनंतीच्या अनेक याचिका ॲड. व्यंकटेश धोंड, ॲड. संभाजी टोपे, ॲड. नितीन गांगल व अन्य वकिलांमार्फत करण्यात आल्या होत्या.

'सरकारला पुनर्विलोकनाचा अधिकार असला तरी ज्या पद्धतीने मुख्य सचिवांनी स्थगितीचे आदेश काढले आहेत, ते घटनेच्या तत्त्वांशी विसंगत आहे,' असे निरीक्षण मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय व न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठानेही नोंदवून सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर, मुख्य सचिव सौनिक यांनी बुधवारी महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ यांच्यामार्फत २९ सप्टेंबरचे नवे परिपत्रक सादर केले.

'उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व प्रशासकीय विभागांनी प्रकरणनिहाय विचार करून मागे घेतलेल्या स्थगिती व्यतिरिक्त ज्या कामांच्या अंमलबजावणीस १८ जुलै व २१ जुलै २०२२च्या मुख्य सचिवांच्या टिपणीन्वये आजही स्थगिती कायम आहे, अशा कामांवरील स्थगिती सरसकटपणे उठविण्यात येत आहे. या प्रकरणी सर्व विभागांनी कामनिहाय आढावा घेऊन व उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदींचा विचार करू सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करावयाची आहे. त्याबाबत स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येतील,' असे सौनिक यांनी नव्या परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

### याचिकाकर्त्यांना तरीही मुभा

'सरकारने आता विकासकामांवरील स्थगिती उठवण्याची भूमिका घेतली असली, तरी पूर्वी मंजूर झालेल्या कामांचे पुनर्विलोकन करण्याची मुभा सरकारला दिली जाऊ शकत नाही. कारण अशा अन्य प्रकरणांत उच्च न्यायालयाच्या अन्य खंडपीठांच्या निर्देशांप्रमाणे ती-ती विकासकामे पुढे गेली आहेत. आमच्या विकासकामांच्या बाबतीत आता पुनर्विलोकन करायची मुभा दिल्यास आगामी लोकसभा निवडणुकीमुळे संभाव्य आचारसंहिता लक्षात घेता कामे पूर्ण होण्यासाठी काही महिन्यांचाच अवधी शिल्लक आहे,' असे म्हणणे ॲड. टोपे यांनी मांडले. त्याची दखल घेऊन '२९ सप्टेंबरच्या मुख्य सचिवांच्या परिपत्रकाप्रमाणे पुनर्विलोकन होऊन कोणत्याही विभागाने कोणताही प्रकल्प रद्द केल्यास संबंधित याचिकाकर्त्याला उच्च न्यायालयात पुन्हा याचिका करण्यासह योग्य त्या कायदेशीर मार्गाचा पर्याय उपलब्ध असेल,' असे खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

## इंडिया आघाडीकडून समन्वय समितीची घोषणा

**सुराज्य/मुंबई**

राज्यातील राजकारणात बुधवारचा दिवस अनेक घडामोडींचा ठरला. सरकारने एकीकडे सुधारित पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली असतानाच काँग्रेसनेही लोकसभा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू केली. 'इंडिया' आघाडीने जाहीर केलेल्या समन्वय समितीसाठी काँग्रेसकडून तीन नेत्यांची नावे निश्चित करण्यात आली असून, त्यात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, कार्याध्यक्ष नसीम खान आणि बसवराज पाटील यांचा समावेश असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.



प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याच 'मातोश्री'वर झालेल्या बैठकीत ही नावे निश्चित करण्यात आली आहेत. इंडिया आघाडीची काही दिवसांपूर्वीच मुंबईत बैठक झाली होती. यात आघाडीतील पक्षांच्या समन्वयासाठी आणि लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाची रणनीती ठरविण्यासाठी समन्वय समिती नेमण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार काँग्रेसकडून नावे निश्चित करण्यात आली. लवकरच इतर पक्षाच्या सदस्यांची नावे निश्चित होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

काँग्रेसने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्याकरिता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे शिष्टमंडळ लवकरच विभागनिहाय आढावा घेणार असून, त्याची सुरुवात ७ नोव्हेंबरला नवी मुंबई येथून होणार आहे. या दिवशी कोकणातील मतदारसंघाचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानंतर ८ नोव्हेंबरला पुण्यात पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघाचा आढावा घेण्यात येईल, तर ९ नोव्हेंबरला नाशिक येथे उत्तर महाराष्ट्रातील मतदारसंघाचा आढावा घेतला जाणार आहे. १० नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील मतदारसंघाचा आढावा घेतला जाणार असून, त्यापाठोपाठ ११ नोव्हेंबरला अमरावती येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे.

## माजी नगरसेविकेवर वारंवार अत्याचार

**सुराज्य/पुणे**

अश्लील व्हिडिओ आणि फोटो व्हायरल करण्याची धमकी देत पुण्यातील माजी नगरसेविकेवर वेळोवेळी बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आरोपी सचिन मच्छिंद्र काकडे (वय ४३ वर्षे, रा. संतोषनगर कात्रज) याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४० वर्षीय पीडित महिलेने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार २०१७ पासून गुन्हा दाखल होईपर्यंतच्या काळात घडला आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, आरोपी सचिन काकडे याने मैत्रीचा गैरफायदा घेऊन व समाजात बदनामी करण्याच्या हेतूने व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडित महिलेवर वेळोवेळी बलात्कार केल्याचा आरोप आहे. तसेच आरोपीने पीडित महिलेकडे पैशाची मागणी करत पैसे दिले नाहीत, तर याबाबत नवऱ्याला सांगण्याची धमकी दिली होती.

आरोपीने पीडित महिलेकडून २०१७ पासून १ मे २०२३ पर्यंत १० लाख रुपये घेतले. दरम्यान २ ऑक्टोबर रोजी आरोपी सचिन हा सकाळी ८ वाजता पीडित महिलेच्या घरी आला आणि 'तू दुसरे लग्न केले आहेस, तुझ्यामुळे माझी बायको मला सोडून गेली असं म्हणत पीडित महिलेला मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन निकाळजे करत आहेत.

## राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका जाहीर

### नऊ ऑक्टोबरपासून प्रक्रिया होणार सुरु

**सुराज्य/पुणे**

अंतिम अथवा प्रारूप मतदारयाद्या सात जूनपर्यंत प्रसिद्ध केलेल्या २७ हजार ६४ सहकारी संस्थांच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. येत्या ९ ऑक्टोबरपासून निवडणुकांच्या प्रक्रिया सुरू करण्याचे आदेशही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने जारी केले आहेत.

या संदर्भात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव वसंत पाटील यांनी माहिती दिली. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०मधील कलम ७३ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) तरतुदीन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण सरकारने पुढे ढकललेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश जारी केले आहेत.



ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांकरिता प्रारूप व अंतिम मतदारयाद्या ७ जूनपर्यंत किंवा त्यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आल्या अशा सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आल्या आहेत, त्या टप्प्यापासून ९ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुकीकरीता ८ जून ते २१ ऑगस्ट या दरम्यान प्रारूप अथवा अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत, अशा सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी १ ऑक्टोबरपर्यंतच्या नव्याने प्रारूप मतदारयाद्या तयार करण्यात येणार आहेत. ज्या प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणुकांकरीता प्रारूप मतदारयाद्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या नाहीत, अशा प्रलंबित संस्थांच्या प्रारूप मतदारयाद्या तयार करण्यासाठी आवश्यकतेनुसार प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## समृद्धी महामार्ग तब्बल ५ दिवस राहणार बंद

**सुराज्य/छ. संभाजीनगर**

जालना ते छत्रपती संभाजी नगर समृद्धी महामार्गावर पॉवर ग्रीड ट्रान्समिशन अतिउच्च दाबवाहिनी टॉवरचे काम करण्यात येणार आहे. यासाठी पाच दिवस तीन तासांसाठी समृद्धी महामार्ग बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता रामदास खलसे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर पॉवर ग्रीड ट्रान्समिशन अतिउच्चता वाहिनीचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी जालना ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान दोन्ही बाजूंनी वाहतूक मंगळवार दि. १० ऑक्टोबर ते गुरुवार दिनांक १२ ऑक्टोबर दरम्यान दुपारी १२ ते साडेतीन आणि २५ व २६ ऑक्टोबर रोजी १२ ते ३ या वेळेत समृद्धी महामार्ग बंद राहणार आहे.



**पर्यायी मार्ग कोणता?**

तब्बल ५ दिवस समृद्धी महामार्ग बंद ठेवण्यात येणार असल्याने प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून पर्यायी मार्ग सुचवण्यात आला आहे. नागपूरकडून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सावंगी इंटरचेंज-जालना महामार्गावरून विरुद्ध दिशेने निधोना-जालना समृद्धी महामार्गावरप्रवेशकरूननागपूरकडे वळवण्यात येणार आहे. तसंच इंटरचेंज-निधोना एमआयडीसी जालना महामार्गावरून छत्रपती संभाजीनगर केंब्रिज शाळा उजवीकडे वळून सावंगी बायपास सावंगी इंटरचेंजहून शिर्डीच्या दिशेने प्रवासी जाऊ शकतात.

## शिंदे समर्थक खासदार अडचणीत

### ▶▶ डीनला टॉयलेट स्वच्छ करायला लावले

**सुराज्य/नांदेड**

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात झालेल्या मृत्यूतांडवाने राज्यभरात खळबळ उडाली. त्यानंतर मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे खासदार हेमंत पाटील यांनी रुग्णालयातील अस्वछतेवरुन आक्रमक पवित्र घेत चक्क डीनच्या हातात झाडू देत शौचालयाची स्वच्छता करायला लावली. मात्र, हे प्रकरण खासदार हेमंत पाटील यांच्या अंगलट आले आहे. डीनला स्वच्छता करायला लावून अपमानस्पद वागवणूक दिल्याप्रकरणी हेमंत पाटील यांच्यासह इतर १० ते १२ जणांविरोधात ग्रामीण पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुग्णालयाचे डीन श्याम वाकोडे यांच्या फिर्यादीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# आज घमासान...कुणाच्या अंगात किती पाणी?

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीसंदर्भात निवडणूक आयोगासमोर आज शुक्रवारी सुनावणी घेण्यात येणार आहे. दुपारी ३ वाजता ज्येष्ठ नेते शरद पवार आणि त्यांचे पुतणे अजितदादा यांच्या गटात वर्चस्वावरून सुनावणीच्या दरम्यान सुंदोपसुंदी होण्याची चिन्हे दिसत आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस ही माझीच,असा दावा दोघांनी केल्यामुळे सुनावणीवेळी काका-पुतण्या यांच्यात घमासान होण्याची शक्यता दिसत आहे.सुनावणीच्या पूर्वसंध्येला शरद पवारांनी पुतण्याच्या गटाला चांगलीच तंबी दिली आहे.त्यामुळे कुणाच्या अंगात किती पाणी हे आयोगासमोर होणाऱ्या युक्तीवादातून पहायला मिळेल. राज्यात पालकमंत्रीपदाच्या वाटणीवरून कसे नाट्य रंगले होते हे पहायला मिळाले आहे आता राष्ट्रवादी काँग्रेसमधील संघर्षातून महानाट्य बघायला मिळेल.

शिंदे-ठाकरे या दोन गटातील शिवसेनेचा वाद संपूर्ण महाराष्ट्राने बघितलेला आहे. त्याच्यानंतर आता आजपासून अजून एक वेगळी लढाई सुरू होणार आहे. दुपारी तीन वाजता निवडणूक आयोगामध्ये राष्ट्रवादीच्या निवडणूक चिन्हाबाबत पहिली सुनावणी होईल. शरद पवार गटाकडून या सगळ्या संदर्भात तयारी करण्यात आली आहे.



गुरूवारी शरद पवार गटाने दिल्लीतल्या कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये कार्य समितीची एक बैठक घेतली. निवडणूक चिन्ह गोठवले गेले किंवा जर आपल्या विरोधात निर्णय आला त्याचे काय विपरीत परिणाम होणार? पुढे नेमके कोणते पाऊल उचलायचे यावर चर्चा करण्यात आल्याचे सांगण्यात येते.

शरद पवार गटाकडून जवळपास आठ ते नऊ हजार शपथपत्र दाखल करण्यात आले आहेत. शरद पवार गटाचा दावा आहे की, अजित पवार गटापेक्षा कागदपत्रांची संख्या ती जास्त आहे. अजित पवार गटाने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये जे दोष आहेत, ते निवडणूक आयोगाला दाखवणार आहेत. अजित पवार गटाच्या कागदपत्रांमध्ये काही मृत व्यक्तींच्या नावे ही शपथपत्र दाखल केली गेली आहेत. काही शिक्षण संस्थांचे कर्मचारी आहेत की जे सरकारी नोकरीला आहेत त्यांचे सुद्धा शपथपत्र दाखल करण्यात आल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे.

### काकांनी ठणकावले...

राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावर माझी निवड योग्य नाही म्हणता, पण त्या पत्रावर तुमच्याच सह्या आहेत, असे ठणकावून सांगत राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हाचा वापर करण्याचा अधिकार फक्त आम्हालाच आहे, असा इशारा राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अजित पवार आणि त्यांच्या गटाला दिला आहे. निवडणूक आयोगाचा निकाल आपल्याच बाजूने लागेल. मात्र निकाल काहीही लागला तरी चिंता करण्याचे कारण नाही. मी पाच निवडणुका वेगवेगळ्या चिन्हावर लढलो आणि निवडून आलो. चिन्हे बदलले तरी लोक आपला निर्णय बदलत नाही. आपण संघर्षाची भूमिका घेतलेली आहे आणि देशातलंही वातावरण बदलत आहे, असे म्हणत शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये जान भरली.

# मनोज जरांगे-पाटलांचे सोलापुरात जंगी स्वागत

## पाचशे किलो वजनाचा घातला हार; मराठा बांधवांनी उघड्या जीपमधून काढली मिरवणूक

सुराज्य/सोलापूर

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज-जरांगे-पाटील यांनी आंदोलन उभारले आहे. राज्यभर दौरा सुरू आहे. गुरुवारी दुपारी तीन वाजता शहरात आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी शहर जिल्ह्यातील मराठा समाज मोठ्या संख्यने जमला होता. जय भवानी, एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत जरांगे-पाटील यांच्यावर गुलाबची पुष्पवृष्टी करण्यात आली. तब्बल पाचशे किलो वजनाचा भला मोठा हार क्रेनने घालून जरांगे-पाटील यांचे स्वागत करण्यात आले.

मराठा आरक्षणाच्या जनजागृतीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी राज्यव्यापारी दौरा चालू केला आहे. गुरूवारी सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिरात सकल मराठा समाजाच्यावतीने जाहीर सभा आयोजित केली होती. या सभेसाठी जरांगे-पाटील यांचे तुळजापुर मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी साडेतीन वाजता आगमन झाले. आगमन होताच फटाक्याची आतशबाजी करण्यात आली त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून पुष्पहार घातला. यावेळी 'एक मराठा लाख मराठा, जय भवानी जय शिवाजी', अशा घोषणा देण्यात आल्या. उघड्या जीपमधून छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून जरांगे-पाटील यांची पार्क चौकात पर्यंत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मार्गावर ठिक ठिकाणी स्वागत करण्यात आले. पार्क चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यानंतर हुतात्मा स्मृती मंदिरातील सभेस रवाना झाले.

या हालगीचा निदाद सर्वत्र भगवे ध्वज, एक मराठा लाख मराठा, अशा घोषणा देत या मिरवणुकित सर्व पक्षीय नेते समाज बांधव सहभागी झाले होते. यामध्ये पुरूषोत्तम बरडे, राजन जाधव, बाळराजे पाटील, विक्रांत पाटील, अनंत जाधव, अमोल शिंदे, दिलीप कोल्हे, दास शेळके, विनोद भोसले, नाना काळे, श्रीकांत डांगे, तात्या वाघमोडे, युवराज मुटकुळे, राम गायकवाड, हरीभाऊ चौगुले, तुकाराम मस्के, मनोहर सपाटे, आप्पा सपाटे, मनोज गादेकर, शेखर फंड, जयकुमार माने, रवी मोहिते, प्रशांत पाटील, दत्ता मुळे, आर.पी. पाटील, सोमनाथ राऊत, इंद्रजित पवार, महेश इंगळे, पोपट भोसले, शाहू सलगर यांच्यासह हजारे समाजबांधव सहभागी झाले होते.





### छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेडतर्फे स्वागत

मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचा सत्कार छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेडच्या वतीने करण्यात आला. मतिन बागवान यांच्या नेतृत्वाखली जवळपास २५ ते ३० मुस्लिम बांधव डोक्यावर पांढऱ्या टोप्या घालून रॅलीमध्ये सगभागी झाले होते. या मुस्लिम बांधवानी मराठा समाजाला आरक्षण मिळावा यासाठी जाहीर पाठिंबा दिला.

### आरक्षण मिळाल्याशिवाय न थांबण्याचा निर्धार

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे मित्रपरिवाराच्या वतीने मनोज जरांगे-पाटील यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात क्रेनच्या माध्यमातून पाचशे किलो वजनाचा हाल घालून सत्कार केला. यावेळी उपस्थित समाज बांधवाना मार्गदर्शन करत अरक्षणाची लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. त्यामुळे आता आरक्षण मिळाल्या शिवाय थांबायचे नाही, असे मार्गदर्शन केले.

### सोलापूर नगर झाले भगवेमय

जरांगे पाटील यांच्या आगमनासाठी सोलापूर नगरी भगवेमय झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुतळा परिसरात भगवे ध्वज मोठ्या दिमाखात डोलत होते. त्याशिवाय मिरवणूक मार्गावर देखील भगवे ध्वज लावण्यात आले होते. ठिक ठिकाणी जरांगे-पाटील यांच्या रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. मोठा जल्लोष यावेळी दिसून आला.



## पालकमंत्र्यांच्या हस्ते कुलगुरुंचा सत्कार

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांचा नूतन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सत्कार केला. सोलापूर विद्यापीठाच्या नूतन कुलगुरूपदी प्रा.डॉ.प्रकाश अण्णा महानवर यांची राज्यपाल रमैश बैस यांनी नियुक्ती केली. नियुक्ती झाल्यानंतर प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांनी मुंबई मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेतली. चंद्रकांत पाटील यांनी डॉ.महानवर यांना शाल, पुष्पगुच्छ व 'मोदी ग्लोबल ऑर्डर' हे पुस्तक भेट देवून सत्कार केला. पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. चंद्रकांत पाटील यांची सोलापूरचे नवीन पालकमंत्री नियुक्ती झाली आहे. दोघेही सोलापूरला येण्या आधी मुंबईतच नव्या पालकमंत्र्यांनी सोलापूर विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूचा सत्कार केला.

## बुद्धिमत्तेला आरक्षणाची जोड द्यावी : जरांगे-पाटील

**उत्तर सोलापूर :** प्रचलित व्यवस्थेत बुद्धिमत्तेला आरक्षणाची जोड मिळाल्याशिवाय भविष्य नाही ,यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे अशी मागणी मराठा आरक्षणाचे आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी केली. मराठा समाजाला ५०टक्याच्या अंतर्गतच आरक्षण मिळावे या मागणीसाठी कोंडी येथे साखळी उपोषण सुरू आहे, गुरुवारी जरांगे पाटील यांनी कोंडीला भेट दिली त्यावेळी ते बोलत होते. शासनाच्या विविध अहवालात मराठा समाज हा मागासलेला आहे हे सिद्ध झाले आहे. सद्यस्थितीला मराठा समाज सामाजिक दृष्ट्या ,आर्थिक दृष्ट्या पिछाडीवर गेला आहे. यामुळे मराठा समाजाला त्याच्या हक्काचे आरक्षण मिळालेच पाहिजे अशी मागणी मनोज जरांगे यांनी यावेळी केली. यावेळी सकल मराठा समाजाचे माऊली पवार आदी होते. जरांगे यांच्या स्वागतासाठी गावकऱ्यांनी मोठी तयारी केली होती. हरिनामाच्या दिंडीने जरांगे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी बाळकृष्ण पाटील, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, शिवसेनेचे भरत पाटील, बाबाराजे नीळ, गणेश पाटील, उपसरपंच किसन भोसले, नागेश नीळ, राम चव्हाण,महेश भोसले, विक्रम भोसले, ब्रह्मदेव पवार, गोविंद पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

## दुहेरी जलवाहिनीसाठी दहा पथके कार्यरत

सुराज्य/सोलापूर

सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या बैठकीत सीईओ शीतल तेली- उगले यांनी उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाचा आढावा घेतला. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी विविध १० पथके कार्यरत करण्यात आली आहेत. आतापर्यंत एकूण १८ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहेत.

स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या सीईओ यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहराची जीवनदायिनी मानल्या जाणाऱ्या उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम नियोजनपूर्वक सुरू आहे. हैदराबादच्या पोचमपाड कंपनीला या कामाचा मक्ता देण्यात आला आहे. ११० किलोमीटर लांबीचे आणि १७० एमएलडी क्षमतेचे हे जलवाहिनीचे काम आहे. हे काम १८ महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. ट्रायलसाठी तीन महिने असे एकूण २१ महिन्यांमध्ये प्रत्यक्षात प्रकल्प सुरू करण्यात येईल. कालबद्ध चार्ट प्रमाणे नियोजनपूर्वक हे काम करण्यात येत आहे. त्याचा आढावा दर आठवड्याला सीईओंकडून घेण्यात येत आहे. मक्तेदार पोचमपाड कंपनीकडून आतापर्यंत १८ किलोमीटरचे काम पूर्ण केले आहे.

### १७ ठिकाणी प्रत्यक्ष कामास सुरुवात

जॅकवेल डिझाईनसाठी आवश्यक जलसंपदा खात्याकडून आवश्यक कामाची परवानगीची गरजेची असून, त्यानंतर प्रत्यक्ष जॅकवेल कामास सुरुवात होईल. दुहेरी पाईपलाईन कामासाठी एकूण ६३ ठिकाणी विविध तांत्रिक परवानगी आवश्यक होती. त्यापैकी २२ ठिकाणची परवानगी सोलापूर महानगरपालिकेने मगितल्यानंतर ती मिळाली आहे. परवानगी मिळालेल्या २२ ठिकाणांपैकी १७ ठिकाणी प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे.

## महालिंगेश्वर मंदिराशेजारी ९ एकर ऊस शॉर्टसर्किटने जळाला

सुराज्य/निमगाव

निमगाव महालिंगेश्वर मंदिराशेजारी निमगाव व खडूस येथील शिवेलगत असणारा राजेश किसन खरात यांचा गट नंबर ६७८ मधील १६० गुंठे व नानासाहेब कारांडे यांचा गट नंबर ६७८ मधील २०० गुंठे असा एकूण ९ एकर अडसाली ऊस महावितरणच्या लोंबकळणाऱ्या तारांमुळे गुरुवार दि ५ ऑक्टोंबर रोजी दुपारी ३.०० वा च्या सुमारास जळून खाक झाला असून सदर दोन्ही शेतकऱ्यांचे जवळपास २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे .

ही माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांना समजताच त्यांनी आपल्या शेतकरी संघटनेच्या डॉ. सचिन शेंडगे, दादा काळे, समाधान काळे, बाळासाहेब कारंडे, भारत कुलाळ, सोमेश्वर राजगे यांच्यासह सदर ठिकाणी धाव घेतली व संबंधित शेतकऱ्यांची बाजू ऐकून घेऊन महावितरणचे अधिकारी शाखा अभियंता गोपाळ कदम व महावितरणच्या कर्मचाऱ्यांना तात्काळ त्या ठिकाणी पाचारण केले व संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या जळालेल्या उसाचा जागेवरच पंचनामा केला यामुळे या भागातील शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे यावेळी या ठिकाणी उपस्थित शेतकऱ्यांनी महावितरण च्या लोंबकळणाऱ्या तारांची देखभाल व दुरुस्ती महावितरण कडून होत नाही अशी तक्रार स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडे केली. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मोबदला मिळावा अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने महावितरणच्या कार्यालयाला घेरावा घालणार असल्याचा इशारा तालुकाध्यक्ष बोरकर यांनी दिला.



## लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी तयार रहावे

### श्रीरंग चव्हाण यांचे आवाहन : शहर काँग्रेस कमिटीची आढावा बैठक

सुराज्य/सोलापूर

सोलापुरला सुशीलकुमार शिंदे आणि काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य आमदार प्रणितीताई शिंदे यांच्यासारखे समर्थ नेतृत्व लाभले आहे. पक्ष संघटना, बूथ कमिटी मजबूत असेल तरच पक्ष मजबूत होईल. १९७८ ला काँग्रेस पक्षावर संकट आले होते पण स्व. इंदिराजी गांधी यांच्या काँग्रेस पक्षाचा झंझावत निर्माण करून सर्वांचा धोबीपछाड करून प्रचंड विजय मिळविला. आताची परिस्थिती तशीच आह. आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या विजयासाठी पक्षाने वेळोवेळी दिलेले कार्यक्रम करावे. मतदार नोंदणी, काँग्रेस पक्षाची संघटना, बूथ कमिटया मजबूत करावे असे आवाहन प्रदेश काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी सोलापुरचे निरीक्षक श्रीरंग चव्हाण यांनी केले.



सोलापूर शहर काँग्रेसची बैठक गुरुवारी काँग्रेस भवन येथे पार पडली त्यावेळी श्रीराम चव्हाण बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे होते. शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांनी प्रास्ताविक केले.

चव्हाण पुढे म्हणाले, ८ ऑक्टोम्बर रोजी पुणे येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हानिहाय आढावा बैठक प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले हे घेणार असून माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणितीताई शिंदे, बसवराज पाटील, माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील, विश्वजीत कदम, महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, बैठकीचे समन्वयक संग्राम थोपटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पश्चिम महाराष्ट्राची विभागाची बैठक पुणे काँग्रेस भवन येथे आयोजित केली आहे. त्या ठिकाणी ही सर्व माहिती दिली जाईल. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री, महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, प्रदेश सचिव अलकाताई राठोड, किसन मेकाले गुरुजी, प्रा. नरसिंह आसादे, माजी महापौर सुशीलाताई आबुटे, आरिफ शेख, माजी नगरसेवक शिवा बाटलीवाला, नरसिंग कोळी, प्रवीण निकाळजे, हाजी तौफिक हत्तुरे, विनोद भोसले, फिरदोस पटेल, अनुराधा काटकर, परविन इनामदार, प्रवक्ते प्रा. अशोक निंम्बर्गी, ब्लॉक अध्यक्ष अरुण साठे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, माजी युवक काँग्रेस अध्यक्ष अंबादास बाबा करगुळे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मा. परिवहन सदस्य तिरुपती परकीपंडला, विणाताई देवकते, संध्या काळे, शुभांगी लिंगराज, रेखा बिनेकर, अंजली मंगोडेकर, देवेंद्र सैनसाकळे, हाजी महमूद शेख, करीम शेख, आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तिरुपती परकीपंडला, आभार भिमाशंकर टेकाळे यांनी केले होते.

## पत्नीला गॅसचे बर्नल फेकून मारले

**सोलापूर :** पतीने पत्नीचा मोबाईल घेऊन जात असताना नकार दिल्याने पत्नीला शिवीगाळ करून गॅसचे बर्नल व गॅसचे लोखंडी स्टॅन्ड असलेले कॅरीबॅग पत्नीच्या तोंडावर मारून पाटीवर मारहाण केल्याची घटना ४ ऑक्टोंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास लक्ष्मी नगर हत्तुरे वस्ती येथे घडली.याप्रकरणी ज्योती मंजुनाथ शिंदे (वय-३५,रा. लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती) यांनी तिचे पती मंजुनाथ तायप्पा शिंदे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार बहिर्जे हे करीत आहेत.

## तुळजापूर ते शिंगणापूर महामार्गाच्या मंजुरीसाठी १५ पासून पायी कावडयात्रा

**माढा तालुक्यातील सर्वपक्षीय नेतेमंडळींचा निर्धार**

सुराज्य/माढा

तुळजापूर ते शिखर शिंगणापूर महामार्गाच्या मागणीसाठी माढा तालुक्यातील सर्वपक्षीय नागरिकांची तुळजापूर ते शिखर शिंगणापूर कावड यात्रा दिनांक १५ ऑक्टोबर पासून काढली जाणार असून याच्या चर्चेसाठी आणि नियोजनासाठी पडसाळी ता माढा येथे नुकतीच सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांची मिटींग झाली.

तुळजाभवानी आणि छत्रपती शिवाजी महाराजाचे आराध्य दैवत शंभू महादेव यांना जोडणारा हा महामार्ग होणे अत्यावश्यक आहे. यासाठी शासनदरबारी रेटा लावणे गरजेचे आहे.म्हणून जात धर्म पंत आणि पक्ष सोडून सर्वानी यासाठी एकत्र येण्याचे आवाहन नेत्यांनी केले.



कावड यात्रेच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीस शिवसेना नेते संजय बाबा कोकाटे, संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. बाळासाहेब पाटील, रयत क्रांती संघटनेचे सुहास पाटील, जलतज्ज्ञ अनिल पाटील, ज्ञानेश्वर सलगर, शिवसेनेचे नेते विनोद पाटील, औदुंबर महाडीक, पंचायत समिती सदस्य डॉ. प्रदीप पाटील, पडसाळीचे सरपंच योगेश पाटील, व्हा चेअरमन सुधीर पाटील, राजाभाऊ चवरे, राहुल पाटील, नगरसेवक नितीन साठे, अजिनाथ माळी, बेंबळेचे सरपंच विजय पवार, परितेचे सरपंच हनुमंत भोसले, चिंचोलीचे सरपंच संतोष लोंढे, भुताष्टेचे सरपंच सुरेश यादव, भेंडचे सरपंच संतोष दळवी, सरपंच राहुल जाधव, महेश पाटील, दीपक खोचरे, निवृत्ती तांबवे,नागेश गायकवाड, पोपट ठेंगल, महारुद्र जाधव, बालाजी मोजमुले सचिन पाटील, प्रकाश चोपडे, संतोष यादव, राजाभाऊ यादव आदी उपस्थित होते.

## माल, माथाडी कामगारांचा मोर्चा; सोलापूर मार्केट यार्डातील लिलाव बंद

सुराज्य/सोलापूर

जिल्हा हमाल मापाडी माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीच्या वतीने विविध मागण्यांसाठी कामगार आयुक्त कार्यालयावर हलगी मोर्चा काढण्यात आला. त्यामुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील लिलाव गुरुवारी बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे बाजार समितीच्या आवारात शुकशुकाट पाहायला मिळाला.

गेल्या १० ते १५ वर्षांमध्ये शासनाने जिल्हा माथाडी मंडळाकडे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागी नवीन नेमणुका केलेल्या नाहीत. जिल्हा माथाडी मंडळाकडे निरीक्षक व कर्मचाऱ्यांची नव्याने भरती करताना जिल्हा माथाडी मंडळाकडील नोंदणीकृत हमाल-तोलाईदार महिला माथाडी कामगारांच्या मुला-मुलींची प्राधान्याने भरती करणे सक्तीचे करावे व त्यांची भरती करावी, जिल्हा माथाडी मंडळ सक्षम होण्यासाठी स्थानिक माथाडी मंडळावर शासन नियुक्त हमाल व मालक प्रतिनिधी सदस्यांच्या त्वरित नियुक्त्या कराव्यात, माथाडी बोर्डाकडे नवीन नोंदणी कामगारांसाठी नोंदणी साठी पंढरपूर येथील वखार महामंडळातील अर्ज माथाडी मंडळाकडे दाखल केले असून, अजूनपर्यंत त्यांची नोंदणी केली नाही. तरी ती त्वरित करून घेण्यात यावी, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व अडत व्यापाऱ्यांच्या - माथाडीत नोंदी करून घ्याव्यात, बाजार समितीमध्ये अडत व्यापाऱ्यांकडे बिगर नोंदीत कामगार काम करतात. हे कामगार माथाडी बोर्डात नोंदीत नसल्यामुळे या कामगारांचा माथाडीत भरणा होत नाही. कामगारांची लेव्ही बुडवून रोखीने पगार दिला जातो. त्यामुळे सर्व्हे करून बिगर नोंदीत कामगारांची माथाडीत नोंद करावी आदी मागण्यांचे निवेदन कामगार आयुक्तांना देण्यात आले.




यावेळी संचालक शिवानंद पुजारी, हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे, भीमा सीताफळे, संतोष सावंत, सुभाष लोमटे, राहुल सावंत, सुखदेव चव्हाण, सुरेश बागल, गोरख जगताप, सिद्धू हिप्परगी, दत्ता मुरूमकर, चांद गफार आदी उपस्थित होते.